मंगळवार, १४ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३२७
www.ramprahar.com
# रामप्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## ईडीकडून काँग्रेस नेते राहुल गांधींची चौकशी



**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्डच्या मनी लॉण्डरिंग प्रकरणात काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांची सोमवारी (दि. १३) सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) चौकशी केली. अलीकडेच ईडीने काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी आणि खासदार राहुल गांधी यांना चौकशीसाठी समन्स जारी केले होते. त्यानुसार राहुल हे सोमवारी ईडी कार्यालयात हजर झाले. त्यांची तीन तास चौकशी करण्यात आली. त्यांच्यासोबत प्रियांका गांधी होत्या. दरम्यान, या वेळी गोंधळ घालून कामकाजात अडथळा आणणाऱ्या काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या सर्व घडामोडींमध्ये भाजप नेत्या तथा केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी काँग्रेस नेते हे गांधी घराण्याची दोन हजार कोटींची संपत्ती वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.


अंतरंग

महाडच्या विन्हेरे परिसरात बिबट्याची दहशत/२


नगर परिषद प्रभाग आरक्षण सोडत जाहीर/५

खो-खो स्पर्धेत नवी मुंबई महापालिका संघ उपविजेता/८


# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज देहूत

### संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराचे होणार लोकार्पण





**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (दि. १४) महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून त्यांच्या हस्ते श्रीक्षेत्र देहू येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराचे लोकार्पण होणार आहे. देहूतील मुख्य मंदिरामध्ये दगडात कोरीव काम करून शिळा मंदिर साकारण्यात आले आहे.

पंतप्रधान मोदी दोन तास देहू परिसरात असणार आहेत. दुपारी १ वाजून १० मिनिटांनी पंतप्रधानांचे लोहगाव विमानतळावर आगमन होईल. १ वाजून ४५ मिनिटांनी ते जगद्गुरू संत तुकाराम महाराज मंदिर संस्थान परिसरात दाखल होतील. या ठिकाणी संत तुकाराम महाराज मूर्ती, शिळा मंदिराचा लोकार्पण सोहळा होईल. २ वाजून १० मिनिटांनी पंतप्रधान सभेच्या ठिकाणी दाखल होतील. सभामंडपात वारकरी, उपस्थित भाविकांशी ते संवाद साधणार आहेत. २० जूनला तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून त्यापूर्वी लोकार्पणाचा सोहळा होत असल्याने वारकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

देहू येथील कार्यक्रमानंतर पंतप्रधान मोदी मुंबईत दाखल होतील. त्यांच्या हस्ते राजभवनमध्ये 'जल भूषण' या नव्याने उभारण्यात आलेल्या राज्यपालांच्या निवासस्थानाची इमारत आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या संग्रहालयाचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर 'मुंबई समाचार' या गुजराती दैनिकाला २०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या समारंभाला पंतप्रधान उपस्थित राहतील.

# विधान परिषद निवडणूक अटळ

## ■ १० जागांसाठी ११ उमेदवार रिंगणात



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या १० जागांसाठी ११ उमेदवारांचे अर्ज कायम राहिल्याने निवडणूक होणार हे स्पष्ट झाले आहे. भाजपचे पाच, तर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांचे प्रत्येकी दोन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी २० जूनला मतदान होणार आहे.

भाजपकडून विधान परिषदेसाठी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री राम शिंदे, आमदार प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय आणि महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष उमा खापरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर भाजपच्या पाठिंब्यावर रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे.

शिवसेनेने सचिन अहिर आणि आमश्या पाडवी यांना, राष्ट्रवादी काँग्रेसने रामराजे नाईक-निंबाळकर आणि एकनाथ खडसे यांना, तर काँग्रेसने भाई जगताप आणि चंद्रकांत हंडोरे यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादीच्या शिवाजीराव गर्जे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यांनी डमी अर्ज दाखल केला होता.

### पाचवी जागाही जिंकणार -देवेंद्र फडणवीस



**मुंबई** : सत्ताधारी पक्षातील आमदारांमध्ये नाराजी आहे. त्याचा फायदा आम्हाला विधान परिषद निवडणुकीत होईल. आम्ही पाचवा उमेदवार उभा केला आहे. ही जागा निवडून आणू, असा विश्वास माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते पुढे म्हणाले की, सत्तारूढ पक्षाने ही निवडणूक बिनविरोध करावी असा आमचा प्रयत्न होता, मात्र काँग्रेसने उमेदवार मागे न घेण्याची भूमिका घेतली. त्यामुळे ही निवडणूक होणार आहे. महाविकास आघाडीत समन्वय नसल्याने ही निवडणूक लादली गेली.

**भाजप उमेदवार**
१) प्रवीण दरेकर
२) राम शिंदे
३) प्रसाद लाड
४) श्रीकांत भारतीय
५) उमा खापरे

**शिवसेना**
१) सचिन अहिर
२) आमश्या पाडवी

**काँग्रेस**
१) चंद्रकांत हंडोरे
२) भाई जगताप

**राष्ट्रवादी काँग्रेस**
१) रामराजे नाईक-निंबाळकर
२) एकनाथ खडसे

# राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय राऊतांवर नाराज

### थेट खासदार शरद पवारांकडे तक्रार



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीत शिवसेना उमेदवार संजय पवार यांच्या पराभवानंतर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त करीत अपक्ष आमदारांवर पराभवाचे खापर फोडले. राष्ट्रवादी समर्थक अपक्षांवर आरोप करणाऱ्या राऊतांची सोमवारी (दि. १३) राष्ट्रवादीच्या नेत्यांनी पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याकडे तक्रार केली. यावर आता खासदार पवार काय पाऊले उचलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आगामी विधान परिषद निवडणुकीसंदर्भात खासदार शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांची बैठक सिल्व्हर ओक निवासस्थानी बोलावली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, जलसंपदामंत्री जयंत पाटील, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते. संजय राऊत यांनी अपक्ष आमदारांबाबत केलेल्या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीत तणाव निर्माण होत असल्याची भावना या वेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी खासदार पवार यांच्याकडे व्यक्त केली.

राज्यसभा निवडणुकीच्या निकालानंतर संजय राऊत यांनी शिवसेनेशी दगाबाजी करणाऱ्या अपक्ष आमदारांची नावे जाहीर केली होती. देवेंद्र भुयार, संजय शिंदे, श्यामसुंदर शिंदे यांच्यावर क्रॉस व्होटिंगचा आरोप केला होता. त्यानंतर या तीनही आमदारांनी नाराजी दर्शविली होती. आमदार देवेंद्र भुयार यांनी तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यानंतर ते उपमुख्यमंत्री अजित पवारांनांही भेटले. विधान परिषदेची निवडणूक समोर असताना अशा प्रकारचे वक्तव्य करणे चुकीचे आहे, असे आमदार भुयार म्हणाले. याचा राष्ट्रवादीच्या बैठकीत ऊहापोह होऊन उपस्थित नेत्यांनी राऊतांबद्दल नाराजी व्यक्त केली.

## निवडक

### मुसेवाला हत्येप्रकरणी संतोष जाधव जेरबंद

**पुणे** : पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणातील आरोपींपैकी एक संतोष जाधवला जेरबंद करण्यात आले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी गुजरात राज्यातील कच्छमधून त्याला अटक केली. संतोषसोबत त्याच्या एका साथीदारालाही पोलिसांनी अटक केलीय. दोघेही लॉरेन्स बिष्णोई टोळीत सामिल होते. **(सविस्तर वृत्त २ वर..)**

### ड्रग्ज सेवनप्रकरणी सिद्धांत कपूरला अटक

**मुंबई :** अभिनेता शक्ती कपूरचा मुलगा आणि अभिनेत्री श्रद्धा कपूरचा भाऊ सिद्धांत कपूरला ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली. सिद्धांतसह सहा जण बंगळुरूच्या एमजी रोडवर असलेल्या हॉटेलमध्ये पार्टी करीत होते. तेथे पोलिसांनी छापा टाकला. सिद्धांतने ड्रग्ज घेतल्याचे मेडिकल चाचणीत उघड झाले आहे. त्यामुळे सिद्धांतला उलसुरु पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# पनवेल मनपाच्या प्रारूप प्रभागाची भौगोलिक सीमा रचना जाहीर



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या सन २०२२मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागाची भौगोलिक सीमा रचना सोमवारी (दि. १३) जाहीर करण्यात आली असून त्यावर २४ जूनपर्यंत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिकेची दुसरी सार्वत्रिक निवडणूक सन २०२२मध्ये होणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे प्रारूप प्रभागाची भौगोलिक सीमा रचना सोमवारी रोजी जाहीर करण्यात आली. यामध्ये ८९ नगरसेवकांसाठी ३० प्रभाग आहेत. त्यापैकी २९ प्रभागांतून प्रत्येकी तीन प्रतिनिधी, तर एका प्रभागातून दोन प्रतिनिधी निवडले जाणार आहेत. या जाहीर झालेल्या प्रभाग रचनेबाबत हरकती व सूचना २४ जून दुपारी ३ वाजेपर्यंत महापालिका आयुक्तांकडे निवडणूक कार्यालयात दाखल करावयाच्या आहेत.

हरकती व सूचना दाखला करणाऱ्यांना सुनावणीसाठी हजर राहण्याबाबत स्वतंत्र कळविण्यात येणार आहे. प्रारूप प्रभाग रचना नकाशा, अधिसूचना, प्रभागांची व्याप्ती व चतु:सीमा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर, महापालिका मुख्यालयात आणि प्रभाग कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**लोकसंख्या ५,०९,९०१**
**एससी ३७,९२३**
**एसटी १७,७२७**

**एकूण नगरसेवक ८९**
**एकूण प्रभाग ३०**
**२९ प्रभागांतून प्रत्येकी तीन, एका प्रभागातून दोन**

## कोरोना वाढतोय!

**मुंबई : प्रतिनिधी**

देशात गेल्या २४ तासांमध्ये आठ हजार ८४ नव्या रुग्णांची नोंद झाली असून १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार देशभरातील सक्रिय रुग्णांची संख्या ५० हजारांवर गेलीय. विशेष म्हणजे यातील सर्वाधिक १७ हजार ३८० रुग्ण महाराष्ट्रातील, तर १० हजारांपेक्षा जास्त रुग्ण एकट्या मुंबईतील आहेत.

## पुण्यात बसचालकाचा महिलेवर बलात्कार

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात एका महिलेचे खासगी बसचालकाने अपहरण करीत तिच्यावर बलात्कार केल्याची घटना घडली आहे. ही महिला बाहेर गावावरून पतीसोबत पुण्यात आली होती व ते खोली शोधत होते. या वेळी आरोपीने या दाम्पत्याला बसमध्येच झोपण्यास सांगितले. त्यानंतर पती खाली उतरल्यावर बस अचानक सुरू करून कात्रज परिसरात घेऊन जात महिलेवर बलात्कार केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित महिला २१ वर्षे वयाची असून वाशीम जिल्ह्यातील आहे. ती पतीसोबत पुण्यात आली होती. पुण्यात दोघे राहण्यासाठी खोली शोधत होते. रात्र झाल्यामुळे आरोपी चालक नवनाथ शिवाजी भोंग (वय ३८) याने या दाम्पत्याला बसमध्ये झोपण्यास सांगितले. दोघेही नवीन असल्याने त्यांनी बसमध्ये झोपण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर काही वेळाने महिलेचे पती वॉशरूमला गेले. हे पाहून आरोपी भोंग याने गाडी सुरू करून महिलेवर आधी स्वारगेट व त्यानंतर पुन्हा कात्रज परिसरात बलात्कार केला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.






# मुरूड किनारी डुएट सायकली ठरताहेत पर्यटकांचे आकर्षण

**मुरूड : संजय करडे**

मुरूड समुद्र किनारी आता डुएट सायकली आणण्यात आल्या आहेत. या सायकलवर दोन व्यक्ती विराजमान होऊन अगदी सहज रपेट मारू शकतात. सध्या या डुएट सायकली पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत.



एकदरा येथील चंद्रकांत शांताराम पवार यांनी डुएट सायकली मुरूड समुद्र किनारी पर्यटकांसाठी आणल्या आहेत. सुरुवातीला त्यांनी चार सायकली आणल्या असून मागणी वाढल्यास सायकलींची संख्या वाढविण्यात येणार आहे. मुरूड किनारी या सायकलचा राउंड पर्यटक आवर्जून घेत आहेत. एका राऊंडचे शंभर रुपये आकारण्यात येतात. दोन व्यक्तींना ते परवडत असल्याने या सायकलस्वारीचा आनंद पर्यटक लूटत आहेत.

याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने चंद्रकांत पवार यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी सांगितले, अलिबाग समुद्रकिनारी या सायकली मी पहिल्या व तेव्हाच ठरविले की, मुरूड समुद्र किनारीसुद्धा या सायकली आणायच्या. त्याप्रमाणे या सायकली आणल्या आहेत. शनिवार-रविवारी मुरूड किनारी असंख्य पर्यटक असतात. त्या वेळी या सायकलींना खूप मागणी असून चांगला व्यवसाय होत आहे.

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा

## खो खोमध्ये महाराष्ट्राला दोन्ही गटांत सुवर्णपदक

**पंचकुला : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेंतर्गत झालेल्या खो-खो स्पर्धेतील अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी कमालीचा खेळ करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडिशावर २१-२० (८-६, ७-९ व जादा डावात ६-५) असा रोमहर्षक विजयाची नोंद केली. या सामन्यात महाराष्ट्राच्या कर्णधार जान्हवी पेठे (१:३५, २:२० मि. संरक्षण), प्रीती काळे (१:४५, २:४० मि. संरक्षण व २ गुण), संपदा मोरे (१:३०, १:४० मि. संरक्षण व ६ गुण) आणि वृषाली भोये (४ गुण) यांनी उत्तम कामगिरी केली.

मुलांच्या अंतिम सामन्यातही महाराष्ट्राने ओडिशाचा १४-११ असा एक डाव तीन गुणांनी दणदणीत पराभव केला व सुवर्णपदकावर नाव कोरले. या सामन्यात महाराष्ट्राच्या शुभम थोरात (२ मि. संरक्षण व २ गुण), नरेंद्र कातकडे (२ मि. संरक्षण व २ गुण), ऋषिकेश शिंदे (२ मि. संरक्षण) व रामजी कश्यप (१:५० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी दमदार छाप उमटवली.

# काँग्रेसकडून ‘व्हिक्टिम कार्ड’ खेळण्याचा प्रयत्न

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसकडून ‘व्हिक्टिम कार्ड’ खेळण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. दरम्यान, नॅशनल हेराल्ड प्रकरणी केंद्रीय तपास यंत्रणा सक्तवसुली संचालनालयाने काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी आणि खासदार राहुल गांधी यांना चौकशीसाठी समन्स जारी केला होता. त्यानुसार काँग्रेस नेते राहुल गांधी सोमवारी (दि. १३) ईडी कार्यालयात हजर झाले होते. या मुळे काँग्रेस कार्यकर्त्यांकडून देशभरात ठिकठिकाणी आंदोलन केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसवर कडाडून टीका केली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची ईडीमध्ये चौकशी झाली आणि त्या चौकशीचे निमित्त करून, मोठ्या प्रमाणात काँग्रेसने देशातील विविध शहरांमध्ये जनतेला वेठीस धरण्याचे काम केले. खरे म्हणजे ही चौकशी जी या ठिकाणी झाली, ती न्यायालयाच्या निर्णयानंतर झालेली आहे. एजीएल(असोशिएटेड जर्नल लिमिटेड) च्या संदर्भात ही जी कंपनी आहे. ही कंपनी १९३० साली स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांनी मिळून तयार केली होती. स्वातंत्र्यसंग्रामाचे एक मुखपत्र असले पाहिजे यासाठी, पाच हजार स्वातंत्र्यसंग्राम सैनिक या कंपनीचे मालक होते किंवा भागधारक होते. त्यांच्याद्वारे ती कंपनी संचालित होत होती. २०१०मध्ये राहुल गांधी आणि त्यांच्या परिवाराने, एक यंग इंडियन नावाची कंपनी तयार करून, केवळ पाच लाख रुपयांची कंपनी तयार केली आणि एजीएलचे सगळे शेअर्स हे या कंपनीच्या नावाने हस्तांतरीत करून एजेएलच्या दोन हजार कोटींच्या संपत्तीवर आपली मालकी प्रस्थापित केली आणि



स्वत:च्या कुटुंबीयांच्या मालकीच्या कंपनीत, स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांची कंपनी आणि त्याची दोन हजार कोटी रुपयांची मालमत्ता ही पूर्णपणे हडप केली. या संदर्भात न्यायालयात जेव्हा प्रकरण गेले, त्यावेळी दिल्ली उच्च न्यायालयाने अतिशय स्पष्टपणे २०१९ मध्ये सांगितले की, हा सरळ सरळ भ्रष्टाचार आहे. यानंतरच ईडीने कारवाई सुरू केली आणि त्या कारवाईच्या अंतर्गत हे सगळे पुरावे मिळाल्यानंतरच अशाप्रकारची चौकशी सुरु करण्यात आली आहे. या मुळे मला असे वाटते या संदर्भात, जे काही वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न ’व्हिक्टिम कार्ड’ खेळण्याचा प्रयत्न हा काँग्रेसच्या वतीने केला जातोय, जो चुकीचा आहे. पाच हजार स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांची दोन हजार कोटी रुपयांची संपत्ती ही हडपल्याच्या प्रकरणी ही चौकशी आहे. तसेच मला असे वाटते एजीएल ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि ती जर कोणी खासगी संपत्ती करत असेल, तर त्या संदर्भात अशी कारवाई होणे, हे अत्यंत स्वाभाविक आहे. मला असे वाटते की, काँग्रेस पक्षाने याचा बाऊ करण्याऐवजी ही जी चौकशी सुरू आहे, तिला सामोरे गेले पाहिजे असेही फडणवीस म्हणाले.

### ...अन्यथा भाजपला पुन्हा मैदानात उतरावे लागेल!

ओबीसी आरक्षणासंदर्भात एम्पिरीकल डेटा गोळा करण्याच्या कामात प्रचंड गोंधळ सुरू आहेत. ओबीसींची संख्या घटलेली दिसेल, अशा पद्धतीने हे काम होत आहे. हे सरकार नेहमीच उशिरा जागे होते, म्हणून मी आजच सरकारला इशारा देत आहे. याचा संपूर्ण तपशील योग्य वेळी मी देईनच. मध्यप्रदेश सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्रपणे काम केले. एकदा हे सर्वेक्षण पूर्ण होऊन, न्यायालयात सादर झाले की मग त्यातून माघार घेता येणार नाही आणि ओबीसींचे कायमस्वरूपी आणि मोठे नुकसान झालेले असेल. त्यामुळे आजच सावध व्हा. अन्यथा भाजपाला पुन्हा मैदानात उतरावे लागेल, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी दिला.

## मुसेवाला हत्येप्रकरणी; तिघे पोलिसांच्या ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्येप्रकरणी आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी संतोष जाधव आणि सौरभ महाकाळ यांनी लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधाची कबुली दिली आहे, तर नवनाथ सुर्यवंशीची संतोष जाधवला आसरा दिल्याप्रकरणी चौकशी सुरू असल्याची माहिती अप्पर पोलीस महासंचालक कुलवंत सारंगल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अप्पर पोलीस महासंचालक कुलवंत सारंगल यांनी दिलेल्या माहितीनुसार, पंजाबी गायक सिद्धू मुसेवालाची २९ मे रोजी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या हत्येप्रकरणी पंजाब पोलिसांच्या तपासामध्ये पुण्यातील सौरभ महाकाळ आणि संतोष जाधव या दोघांची नावे समोर आली. या प्रकरणी मंचर येथून सौरभ महाकाळ याला पोलिसांनी ताब्यात घेतले. दरम्यान, सौरभ महाकाळची चौकशी सुरू असताना नवनाथ सुर्यवंशी याने संतोष जाधवला गुजरात येथील भूज येथे आसरा दिल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून गुजरात येथून संतोष जाधव याला रविवारी (दि. १२) ताब्यात घेण्यात आले. यावेळी संतोष जाधवने टक्कल केल्याचे आढळून आले. ओळख लपवून ठेवण्यासाठी त्याने टक्कल केल्याचे आरोपी संतोष याने सांगितले.

दरम्यान, संतोष जाधव आणि सौरभ महाकाल कांबळे यांनी ते पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंध असल्याची कबुली दिली आहे. नवनाथ सुर्यवंशी याने संतोष जाधवला आसरा दिल्याप्रकरणी चौकशी सुरू आहे. या प्रकरणी अधिक माहिती समोर येईल, असेही त्यांनी सांगितले.

## महाड पालिकेच्या १० प्रभागांची सोडत जाहीर; महिलांचे वर्चस्व

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर पालिकेची आरक्षण सोडत सोमवारी जाहीर झाली असून महाड नगर पालिकेच्या १० प्रभागामध्ये १० ठिकाणी महिला आरक्षण जाहीर झाल्याने येत्या निवडणुकीत पालिकेच्या सत्तेत महिलांचे वर्चस्व राहणार आहे.

महाड नगर पालिकेच्या एकूण २० जागांसाठी आज आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. १० प्रभागामध्ये दहा महिला आरक्षण जाहीर झाले आहे. महाड शहरातील प्रभाग एक मध्ये एक अ महिला खुला, एक ब खुला (सर्वसाधारण) प्रभाग दोन मध्ये दोन अ खुला (महिला), दोन ब खुला (सर्वसाधारण), प्रभाग तीन अ अनुसूचित जाती(महिला), तीन ब खुला (सर्वसाधारण), चार अ खुला (महिला), चार ब खुला (सर्वसाधारण), पाच अ खुला (महिला), पाच ब खुला (सर्वसाधारण), सहा अ खुला (महिला), सहा ब खुला (सर्वसाधारण), सात अ खुला (महिला), सात ब खुला (सर्वसाधारण), आठ अ खुला (महिला), आठ ब खुला (सर्वसाधारण), नऊ अ खुला (महिला), नऊ ब खुला (सर्वसाधारण), १० अ खुला (महिला), १० ब खुला (सर्वसाधारण) असे आरक्षण जाहीर झाले असल्याची माहिती महाड नगर परिषदेकडून देण्यात आली आहे.

## विन्हेरे परिसरात बिबट्याचा वावर

**महाड :** जंगलात लागणारे वणवे याचा परिणाम वन्यप्राण्यांचा वावर वस्तीपर्यंत मोठ्या प्रमाणावर झाला आहे. जंगलातील अन्न संपुष्टात आल्याने या वन्यप्राण्यांनी आपला मोर्चा नागरी वस्तीकडे वळविला आहे. महाड तालुक्यातील विन्हेरे गावाजवळील खरबकोंड गीजेवाडी गावामधील विशाल सावंत यांच्या घरातील पाळीव श्वान बिबट्याच्या भक्ष्यस्थानी जाता जाता वाचले आहे. बिबट्याच्या दहशतीमुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीती वाढली आहे.

खरबकोंड गीजेवाडी गावात ४० घरे असून बिबट्याच्या दहशतीमुळे रात्री घरातून बाहेर पडण्यास लोक घाबरत आहेत.



**पनवेल : अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मिरज आयोजित नोव्हेंबर-डिसेंबर २०२१-२०२२मध्ये झालेल्या संगीत परीक्षेत डॉ. प्रभा अत्रे फाउंडेशन, श्री. शांताराम शास्त्रीय संगीत विद्यालय, स्वरमयी गुरुकुल शाखा-नवीन पनवेलचा १०० टक्के निकाल जाहीर झाला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरू वीणा कुलकर्णी यांचे अभिनंदन होत आहे.**



**उरण : द्रोणागिरी नोड सेक्टर ५१ येथील जयकुमार शेडगे व विजयकुमार शेडगे यांच्या जितेंद्र ई.व्ही. टेक या इलेक्ट्रीक बाईकच्या पहिल्या शोरूमचे उद्‌घाटन भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष विकी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी कैलास काथोरे, अरूण आटपाडकर, बाबासाहेब पाटील, गोरख उबाळे, कृष्णा पाटील, सोमनाथ आटपाडकर आदींनी शेडगे यांना शुभेच्छा दिल्या.**

## मुलांचे लसीकरण वाढवा; केंद्राकडून राज्यांना सूचना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी (दि.१३) देशातील राज्य आरोग्य मंत्र्यांशी संवाद साधला आहे. या वेळी त्यांनी राज्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या. राज्यांनी शाळेत जाणाऱ्या मुलांना कोरोना प्रतिबंधात्मक लस देण्यावर लक्ष द्यावी. तसेच कोरोनाचा बूस्टर डोस ज्येष्ठांना मिळेल याकडे लक्ष द्यावे, असा सूचना आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी राज्यांना केल्या.

जिनोम सिक्वेन्सिंग बळकट करण्याकडे लक्ष द्यावे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. आजपासून देशातील शाळा सुरु झाल्या आहेत. त्यातच देशात कोरोना रुग्णसंख्या वाढत चालली आहे. उपचाराधीन रुग्णसंख्या ४० हजारांपुढे गेली आहे. महाराष्ट्रात रविवारी २,९४६ रुग्ण आढळले असून दोघांचा मृत्यू झाला. यात मुंबईत सर्वात अधिक १, ८०३ रुग्णांचा समावेश आहे. सध्याच्या घडीला राज्यात १६ हजार ३७० रुग्णांवर उपचार सुरु आहेत.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १४ जून २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)
- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.


## भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी

**उरण : बातमीदार**



भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाद्वारे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.


चांदायळी वाडी (केळ्याची माळ) व पुनाडे या शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊ वाटप करण्यात आले. चांदायळी वाडी (केळ्याचा माळ) जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत एकच शिक्षिका आहे. शिवाय शाळा उरण तालुक्यातील अतिदुर्गम भागात आहे. त्यामुळे तेथील मुलांच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून जितेंद्र पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त स्वतःच्या पैशातून एक शिक्षिका शाळेसाठी देण्याचा संकल्प केला. तसेच एका मुलीस शिकविण्यास पाटील यांनी सांगितले. या मुलीचे मानधन पाटील हे देणार आहेत. वाढदिवसानिमित पाटील यांनी आदिवासी भागात खाऊ वाटप, दप्तर वाटप व स्वतःच्या पैशातून शिक्षिका नेमून सामाजिक बांधिलकी जपली आहे. या वेळी भाजपचे सरचिटणीस मनीष पाटील यांचाही वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भाजपचे सरचिटणीस मनीष पाटील, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, भाजपा पागोटे गाव अध्यक्ष विजय पाटील, कुंडेगाव भाजपा गाव अध्यक्ष अशोक मढवी, युवा मोर्चा सरचिटणीस पागोटेचे साईराज भोईर, भाजपा युवा नेते निशांत पाटील, नंदन म्हात्रे, ग्रा.पं. चिरनेर सदस्य रमेश फोफेरकर, मच्छींद्र मढवी, कामगार नेते निलेश पाटील, संदेश पाटील पुनाडे बूथ अध्यक्ष, सत्यवान कातकरी, वैभव पाटील, अक्षय पाटील आदी भाजपचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहात झाला.

## आज दिसणार ‘सुपरमून’!

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्र पृथ्वी भोवती भ्रमण करताना अंडाकृती मार्गाने फिरत असतो, त्यामुळे तो कधी जवळ तर कधी दूर जातो. जेव्हा जवळ येतो, तेव्हा तो मोठा आणि प्रकाशमान दिसतो. यालाच सुपरमून असे म्हणतात. मंगळवार १४ जून रोजी सुपरमून दिसणार असून २०२२ वर्षातील हा असा पहिला सुपरमून असेल.



पौर्णिमेला पाश्चात्त्य देशात ‘स्ट्रॉबेरीमून’ असे म्हणतात. जेव्हा चंद्र पृथ्वीभोवती फिरतो तेव्हा तो एका सपाट वर्तुळाच्या (अंडाकृती किंवा लंबवर्तुळाच्या) मार्गाचा अवलंब करतो आणि पृथ्वीपासूनचे कमीतकमी अंतर ३५७००० किमी (२२२००० मैल) आणि जास्तीत जास्त ४०६००० किमी (२५२००० मैल) अंतर असते. दरम्यान, मंगळवारी चंद्राचे पृथ्वी पासूनचे अंतर ३,५७,६५८ कि. मी. राहणार आहे. नागरिकानी हा सुपरमून अवश्य बघावा, असे आवाहन स्काय वाच ग्रुपचे अध्यक्ष व खगोल अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी केले आहे.

### दुखवटा

## मारुती रसाळ

**रसायनी** : पनवेल तालुक्यातील गुळसुंदे येथील ग्रामस्थ व नाभिक समाजातील ज्येष्ठ कारागिर मारुती देहू रसाळ यांचे शनिवारी



(दि. ११) आकस्मिक निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. ते धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी गेली अनेक वर्षे कर्तव्यनिष्ठेने व प्रामाणिकपणे केशकर्तनालयाचा व्यवसाय केला. त्यांच्या अंत्ययात्रेस विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. मारुती रसाळ यांचा दशक्रिया विधी २० जून आणि उत्तरकार्य २३ जून रोजी गुळसुंदे येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. इन्फोसिस या प्रसिद्ध आयटी कंपनीचे सध्याचे सीईओ सध्या कोण आहेत?**

***अ.*** नारायण मूर्ती ***आ.*** विशाल सिक्का
***इ.*** सलील पारेख ***ई.*** नंदन निलकेणी

**२. १९९३ साली इन्फोसिस कंपनीचा आयपीओ आला होता. त्यावेळी त्याची ऑफर प्राईज किती होती?**

***अ.*** ९५ रुपये ***आ.*** ५०० रुपये
***इ.*** १२५ रुपये ***ई.*** १५०० रुपये

**३. इन्फोसिस कंपनीचे आज (ता. १० जून) चे बाजारमूल्य किती आहे?**

***अ.*** सहा लाख २१ हजार कोटी रुपये ***आ.*** सात लाख २१ हजार कोटी रुपये
***इ.*** पाच लाख ५० हजार कोटी रुपये ***ई.*** दहा लाख २१ हजार कोटी रुपये


Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.


**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**


हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**

# सिडकोनिर्मित इमारती बनल्या धोकादायक


## ■ नवीन पनवेलमध्ये स्ट्रक्चरल ऑडिट झाले नसल्याचे उघड

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील सिडकोने बांधलेल्या २५ वर्षांपेक्षा जुन्या इमारतींचे महापालिकेने सूचना देऊन ही अद्याप स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या इमारतीत अनेक ठिकाणी नवीन बदल करण्याची कामे सुरू आहेत काही ठिकाणी छताचे प्लास्टर पडत आहे. या इमारतींवर महापालिका कारवाई करणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

नवीन पनवेलमध्ये सिडकोने विविध उत्पन्न गटासाठी २५ वर्षा पूर्वी इमारती बांधल्या आहेत. या ठिकाणी सिडकोने त्या इमारतीची जागा ६० वर्षांच्या भाडे कराराने दिली आहे. सिडकोच्या या इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे. या मधील पी–६, सी–५ व सी–६ मध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त सदनिका या सिडकोच्या अधिकार्यांच्या आहेत. त्या भाड्याने दिलेल्या आहेत. याठिकाणी गृह निर्माण संस्था न करता आठ ते दहा इमारती मिळून एक असोसिएशन स्थापन करण्यात आले आहे.

या इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे. अनेकांनी मूळ आराखड्यात बदल करून रूम वाढवल्या आहेत. अनेक रूममध्ये छताचे प्लास्टर पडत आहे. त्यात अनेक जण जखमीही झाले आहेत. काही मालक बसवलेल्या लाद्या काढून नवीन बसवत आहेत. तर काहींनी कॉलम फोडून त्यातील स्टील बदलले आहे. त्यामुळे मूळ इमारतीच्या स्ट्रक्चरला धक्का बसलेला आहे. हा भाग पनवेल महापालिकेमध्ये आल्यावर महापालिकेने सिडकोला इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी पत्र दिले होते, पण अद्याप त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही.





**सिडकोच्या नवीन पनवेलमधील विविध उत्पन्न गटातील इमारती**

पी–६मधील ३६ बिल्डिंग
सी–५मधील ३६ बिल्डिंग
सी–६मधील १२ बिल्डिंग
बी–१०मधील १४ बिल्डिंग
ई मधील १० बिल्डिंग
ए टाईपमधील १०० रूम

**महापालिकेने सांगूनही इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट केले नाही ही धक्कादायक बाब आहे. मी आज कोर्ट कामासाठी पुण्याला आलो आहे. उद्या याबाबत माहिती घेऊन त्वरित कारवाई करतो.**

**–कैलास गावडे, उपायुक्त, पनवेल महापालिका**

**पनवेल महापालिकेने सिडकोला इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत पत्र दिले होते. त्या प्रमाणे आम्ही प्रत्येक असोसिएशनला ऑडिट करण्यास पत्र दिले आहे, पण ते कोणीही केलेले नाही.**

**–संतोष साळी, ए.ई.ई. सिडको**

# खांदा कॉलनीत मान्सूनपूर्व कामांना वेग

## उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी केली पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील खांदा कॉलनी परिसरात विविध मान्सूनपूर्व कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांसाठी उपमहापौर सीताताई पाटील आणि नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी सातत्यपुर्ण पाठपुरावा आणि पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून अखेर मॉन्सूनपूर्व कामे सुरू झाली आहेत.

पावसाळा अगदी तोंडावर आला असताना सिडको प्रशासनाकडे मान्सूनपूर्व कामांसंदर्भात उपमहापौर सीताताई पाटील अणि नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. अखेर प्रशासनाने याची दखल घेत मान्सूनपूर्व कामांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. खांदा कॉलनीमधील सेक्टर ८ आणि १२ येथील रस्त्याची दुरवस्था झाली होती. पाठपुराव्यानंतर येथील रस्त्याची कामे सुरू झाली आहेत. याचबरोबर नालेसफाई, विभागातील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण, वाढलेल्या झाडांची छाटणी यासारख्या कामांना अखेर मुहूर्त मिळाला असून, नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

या कामांची उपमहापौर सीताताई पाटील आणि नगरसेवक एकनाथ गायकवाड यांनी सिडको अधिकारी यांच्यासोबत पाहणी करून आढावा घेतला आणि कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.



# उमरोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भाजपच्या अलका तांडेल बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील उमरोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक सोमवारी (दि. १३) झाली. या निवडणूकीत भाजपच्या अलका प्रकाश तांडेल यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संयज पाटील यांनी नवनिर्वाचित सरपंच अलका तांडेल यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी पनवेल पंचायत समिती सदस्य भुपेंद्र पाटील, माजी सरपंच शांताराम पोपेटा, नितीन काठावले, नारायण मढवी, नायारण माळी, उपसरपंच रोशन पोपेटा, सदस्य प्रितेश गांगरकर, शुभांगी मढवी, रेश्मा पाटील, कमला मढवी, श्वेता माळी, बेबी ठाकूर, रिकण गांगरकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# पोसरीच्या सरपंचपदी भाजपच्या सुनिता तोंडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोसरी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची निवडणूक सोमवारी (दि. १३) झाली. या निवडणूकीत भाजपच्या सुनिता तोंडे यांची बिनविरोध निवड झाली. याबद्दल भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी सरपंच सुनिता तोंडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गाताडे, पंचायत समिती अध्यक्ष सुनिल माळी, केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पोसरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच सतीश पाटील, माजी सरपंच बाबुराव शीद, भावना जोशी, माजी उपसरपंच नाना भोईर, ग्रामपंचायत सदस्य बंडू शीद, कमलाकर शीद, सुनिता शीद, रामदास भोईर, गाव पाटील सुजीत पाटील, सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बळीराम कांबळे, शिवाजी माळी, प्रशांत माळी, निलेश माळी, युवा नेते प्रतीक भोईर, वैभव तोंडे, विशाल जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# पनवेल मनपा कर्मचाऱ्यांच्या सर्तकतेमुळे कळंबोली स्टील मार्केटमधील दुर्घटना टळली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या सर्तकतेमुळे स्टील मार्केट परिसरात होणारी दुर्घटना टळली आहे. स्टील मार्केटजवळील नाल्यात भंगारवाल्यांनी बोटीचा सांगाडा फेकून दिले असून ही बोट ब्रीजखाली अडकली होती. या दरम्यान जर पाऊस झाला असता तर मोठ्या प्रमाणत शहरामध्ये पाणी साचले असते, मात्र महापालिकेचे कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा अपघात टळला आहे.

कळंबोली स्टील मार्केट जवळील एका नाल्यात भंगार वाल्यांनी बोटीचा सांगाडा फेकून दिले होते. ही बोट नाल्यालागून असलेल्या ब्रीज खाली अडकली होती. रायगड जिल्ह्यात सध्या पावसाचे अगमन कधीही होऊ शकते असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. या दरम्यान जर मुसळधार पाऊस झाला असता तर या नाल्यातील पाणी कळंबोली शहरामध्ये मोठ्या प्रमाणात घुसले असते, मात्र महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे यांच्या सतर्कतेमुळे या बोटीचा सांगाडा नाल्या बाहेर काढण्यात आला. अरुण कांबळे यांनी दाखवलेल्या या तत्परतेबद्दल प्रभाग समिती ‘ब’च्या सभापती प्रमिला पाटील आणि भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे यांना धन्यवाद दिले.

# पहिल्याच पावसात वीजपुरवठा खंडित



**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात शुक्रवारी (दि. १०) रात्रीच्या सुमारास पहिल्या पावसाने दमदार सुरुवात केली; मात्र कोसळणाऱ्या पावसाच्या सरीत वीजपुरवठा करणारी केबल तुटून पडल्याची घटना भेंडखळ गावाजवळ घडली. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांना रात्र अंधारात चाचपडत जागून काढावी लागली.

उरण तालुक्यात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी राजा सुखावला; मात्र पावसाच्या सरीत ग्रामीण भागातील गावांना वीजपुरवठा करणारी तार भेंडखळ गावाजवळ तुटून पडल्याची घटना घडली. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांतील वीजपुरवठा खंडित झाला. एकंदरीत पावसाने दिलासा दिला असला तरी महावितरणच्या गलथान कारभारामुळे रहिवाशांना अंधारात चाचपडत रात्र जागून काढावी लागली. तालुक्यातील अनेक रस्त्यांवर पावसाचे पाणी साचून राहिल्याचे चित्र पाहावयास मिळाले. हा पाऊस पेरणीपूरक नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी शेतात भात बियाणे पेरणी करण्यासाठी सुरुवात केली नाही.



**पनवेल : महापालिका प्रभाग क्रमांक १६मध्ये ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार नगरसेविका राजश्री वावेकर यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून विविध ठिकाणी बेंचेस उपलब्ध करून दिले आहेत. याबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी नगरसेविका वावेकर यांचे आभार मानले.**

# वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

शिरढोण येथील साईकृपा हॉटेलमध्ये काम करणारा नारायण पोटले (रा. भोपळीपेण, माणगाव) याला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नारायण हा हॉटेलच्या बाहेर लघवीला जाऊन येतो, असे बोलून गेला व तो परत आला नाही. या वेळी त्याला अज्ञात वाहनाची धडक बसली. ॲम्ब्युलन्सच्या मदतीने त्याला दवाखान्यात पाठवण्यात आले. या वेळी त्याचा मृत्यू झाला. अपघात झाला त्या ठिकाणी एमएच २० बीएल ३२७६ या क्रमांकाची नंबर प्लेट पडलेली पोलिसांना आढळली. अधिक तपास पनवेल शहर पोलीस करत आहेत.

# पनवेल महापालिकेकडून कॅन्सरग्रस्तांना २५ हजारांची मदत

## महिला बालकल्याण विभागाचा स्तुत्य उपक्रम



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिला, मुला–मुलींना २५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. याबाबत महिला बालकल्याण विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन सभापती हर्षदा अमर उपाध्याय यांनी केले आहे.

या योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी १ एप्रिल २०२१ नंतर कॅन्सर या आजाराचे निदान झालेल्या रुग्णास हा लाभ दिला जाईल. वय वर्षे ० ते १८ वर्षाच्या खालील मुला–मुलींना या योजनेंतर्गत लाभ घेता येणार आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा अधिक फायदा होणार आहे. महिला व बालकल्याण विभागात योजनेचे अर्ज उपलब्ध असून गरजू लाभार्थ्यांना अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. त्यामुळे याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करावे, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### लाभार्थींसाठी पात्रतेचे निकष

१. कुटुंबाचे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात किमान तीन वर्षे वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून भाडे करारनामा. रेशनकार्ड, मालमत्ता कर भरल्याची पावती सादर करणे बंधनकारक आहे. (यापैकी कोणताही एक पुरावा).
२. अर्जासोबत पनवेल महानगरपालिका हद्दीतील पिवळे व केशरी रेशनकार्डाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
३. अर्जासोबत रुग्णाचे आधारकार्डची, पॅनकार्ड यांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
४. अर्जासमवेत आरटीजीएससाठी बँकेचे पासबूकची अथवा रद्द धनादेशाची (कॅन्सल्ड चेक) छायांकित प्रत जाडणे आवश्यक आहे.
५. सदरच्या योजनेचा लाभ एकदाच दिला जाईल.
६. अर्जासोबत कॅन्सर निदान झालेबाबत वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
७. अर्जासोबत अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
८. नगरसेवक अथवा नगरसेविका हे संबंधित अर्जदारास ओळखत असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केलेल्या अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.
९. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने लाभ घेणेकरिता एखाद्या अर्जदाराने खोटी माहिती अथवा बनावट दस्ताऐवज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास हा लाभ नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार आयुक्त पनवेल महानगरपालिका यांना असेल.
१०. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे स्वसाक्षांकित केलेली असावीत.
११. प्रत्यक्ष लाभ देतेवळी लाभार्थी हयात आहे किंवा नाही याची खातरजमा करून लाभ लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

## उरण नगर परिषदेची सदस्यसंख्या आता २१

# आठ जागा महिलांसाठी राखीव



**आरक्षण सोडत जाहीर**

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण नगर परिषदेचे १० प्रभागातील आरक्षण जाहीर झाले आहे. नव्याने झालेल्या प्रभाग रचनेच्या ते उमेदवारांची संख्या १७ वरून २१वर पोहचली आहे. १० प्रभागात सर्वसाधारण स्त्रियांसाठी सात जागा तर अनुसूचित जातीसाठी एक जागा आरक्षित ठेवण्यात आले आहे, अशी माहिती उरण मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिली.

**प्रभाग निहाय आरक्षण**

प्रभाग क्रमांक १ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक २ अ अनुसूचित जाती (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ३ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ४ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ५ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ६ अ अनुसूचित जाती (व्यक्ती), ब सर्वसाधारण (स्त्रियांसाठी); प्रभाग क्रमांक ७ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ८ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती); प्रभाग क्रमांक ९ अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (व्यक्ती) ; प्रभाग क्रमांक १० अ सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), ब सर्वसाधारण (स्त्रियांसाठी), क सर्वसाधारण (व्यक्ती).

## संपादकीय

# पुन्हा एकदा रणकंदन

राज्यसभा निवडणुकीतील धक्कादायक निकालानंतर आठवडाभरावर येऊन ठेपलेल्या विधान परिषदेच्या दहा जागांसाठी होणारी निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महाविकास आघाडी प्रयत्न तरी करेल असे वाटले होते, मात्र अंतिमत: महाविकास आघाडीने सहा उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. भाजपच्या पाठिंब्यावर निवडणूक लढवू पाहणाऱ्या सदाभाऊ खोत यांनी अखेरच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. तेवढा विवेक महाविकास आघाडीने दाखवला असता तर बरे झाले असते.

**आता विधान परिषदेच्या दहा जागांसाठी अकरा उमेदवार रिंगणात आहेत. याचा अर्थ पुन्हा एकदा राज्यसभेसारखाच फटका खाण्याची हौस सत्ताधाऱ्यांना आली आहे असेच म्हणावे लागेल. राज्यसभेसाठीच्या निवडणुका गेल्याच आठवड्यात झाल्या. राज्यसभा किंवा विधान परिषदेच्या निवडणुका या बव्हंशी गणितीय पद्धतीने होत असतात. अशाच गणिताच्या पेपरात शिवसेनेला नुकताच भोपळा मिळाला. या निवडणुकीत नेमके कुठे चुकले याचाच अंदाज महाविकास आघाडीच्या नेत्यांना अजून आलेला नाही. तेवढ्यात विधान परिषदेच्या निवडणुका येऊन ठेपल्या आहेत आणि त्या बिनविरोध होणार नाहीत हेदेखील आता स्पष्ट झाले आहे. म्हणजेच पुन्हा एकदा गणिताचा अवघड पेपर सोडविण्याची वेळ सत्ताधाऱ्यांवर येणार! राज्यसभा निवडणुकीत मतदान खुल्या पद्धतीने झाले. आपल्या पक्षाच्या प्रतोदाला मत दाखवण्याची मुभा त्या निवडणुकीत होती. विधान परिषदेची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने पार पडते. त्यामुळे या गणितांसाठी ताळा जमवण्याचे आव्हान महाविकास आघाडीपुढे पुन्हा एकदा उभे ठाकले आहे. राज्यसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना उघड उघड धोबीपछाड देणारे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्याशीच सत्ताधाऱ्यांना सामना करावा लागणार आहे. फडणवीस यांची गणितीय बुद्धी किती कुशाग्र आहे याची चुणूक नुकतीच पहायला मिळाली आणि महाविकास आघाडीचे नेते कुठल्या विषयात 'ढ' आहेत आणि कुठल्या विषयांमध्ये पारंगत आहेत हे गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्राच्या जनतेने पाहिलेच आहे. त्यामुळे निकाल काय लागणार याचा अंदाज एखाद्याला सहज करता येईल. भाजपपुरस्कृत अपक्ष उमेदवार सदाभाऊ खोत यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी एक पाऊल पुढे टाकले. तसा उमदेपणा महाविकास आघाडीने दाखवला असता तर अंकगणिताची प्रश्नपत्रिका सोडवण्याचे संकटदेखील ओढवले नसते, पण अशा उमदेपणाची अपेक्षा सत्तेला चिकटलेल्या नेतेमंडळींकडून कशी करावी? गेल्या आठवड्यातील निवडणुकीत हेच महाविकास आघाडीचे नेते भाजपवर घोडेबाजाराचे आरोप करीत होते. अपक्षांवर दगाबाजीचा ठपका ठेवत होते. जेव्हा उमेदवारी मागे घेण्याची वेळ आली तेव्हा मात्र ते मूग गिळून गप्प बसले. येत्या आठवडाभरात होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या सहा उमेदवारांपैकी एकाला तरी घरी बसवण्याचा 'करेक्ट कार्यक्रम' फडणवीस यांच्या धडाकेबाज टीमला पुन्हा एकदा पार पाडावा लागणार आहे. हा एक उमेदवार कोण असेल याबद्दल उत्सुकता ताणली गेली आहे. ते जळगावचे एकनाथ खडसे असू शकतील किंवा नंदुरबारचे आदिवासी उमेदवार अमश्या पाडवी असू शकतील किंवा मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला धक्का देण्यासाठी भाई जगताप यांचाही कार्यक्रम होऊ शकतो. निवडणूक चुरशीची होणार यात शंका नाही, परंतु त्या निमित्ताने राजकारणाची पातळी घसरू देऊ नये एवढी मात्र कळकळीची विनंती नेतेमंडळींना आहे.**

# महाडला कुणी वालीच नाही...!

***राजकीय आणि विकासाच्या दृष्टीने अनाथ झालेल्या महाडला कोणी वालीच उरलेला नाही. ऐतिहासिक परंपरा, सामाजिक वारसा लाभलेला महाड तालुका दिवसेंदिवस दरिद्री आणि मागास होऊ लागला आहे. विकास पूर्णपणे खुंटला आहे तर प्रगतीच्या वाटा बंद झाल्या आहेत. एवढे थोडेके म्हणून की काय, नैसर्गिक संकटाने इथला नागरीक पुरता बेजार झाला आहे. ठेवीले अनंते तैसेचि रहावे या युक्तीप्रमाने महाडचे दिवस चालले आहेत.***




**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड तालुका हा ऐककाळचा कोकणातला महत्वाचा तालुका होय. कोकणातून येताना चिपळूण महाड आणि थेट मुंबई अशी थांबण्याची ठिकाणे होती. एसटीचा हा महत्वाचा थांबा होता. त्यावेळी महाड आगाराचे वैभवच काही वेगळेचे होते. बस आणि प्रवाशांसाठी प्रशस्त जागा, चांगल्या सुविधा, कँनटीनचे चवदार जेवण, त्या काळातील कोकणातील अत्याधुनिक वर्कशॉप, सुलभ शौचालय, वाहक चालकांसाठी उत्तम विश्राम व्यवस्था, मुबलक पाणी, स्वच्छता, त्यातच महाड बसस्थानक हे महाडच प्रवेशद्वारच होते. त्यामुळे महामार्गावरुन प्रवास करणाऱ्यांना महाड बसस्थानकाची प्रशस्त आणि सुंदर इमारत दिसताच महाड आल्याची जाणीव होत असे. महत्वाचे म्हणजे एसटीच्या याच रस्त्याने इतर वाहने शहरात प्रवेश करत असत आणि तोच एकमेव शहरात प्रवेश करण्याचा मार्ग होता. भले तो एसटीच्या मालकीचा असला तरी तसा विषय किंवा वाद कधीच पुढे आला नव्हता. महाडची ओळख असणारे एसटी स्टँड ही ओळख हरवू लागले आहे. यासाठी आम्ही महाडकरच जबाबदार आहोत. महाडच्या विकासाचा आणि प्रगतीचा कोणताच अजेंडा कोणाकडेच नाही.

महाड महामार्गावरुन महाड बसस्थानक आणि महाड शहरात प्रवेश करणाऱ्या मार्गाची आज दयनीय अवस्था आहे. अस्तित्वात नसलेल्या या मार्गात चिखल आणि दगड गोठे आहेत. वाहने या खड्ड्यांमध्ये अडकत आहेत तर मोटारसायकल स्वारांना मोठी कसरत करावी लागते. महिला तर या मार्गाने स्कुटी घेऊन जाण्याची हिंम्मत करत नाहीत. केवळ दोनशे अडीचशे मिटर लांबी असलेल्या या रस्त्याचे काम ना तर एसटी करत आहे, ना नगरपालिका करत आहे.

हा रस्ता आमच्या मालकीचा नाही म्हणून पालिका हात वर करत आहे तर फक्त एसटीच्या बस साठी असणाऱ्या या मार्गावर बसऐवजी इतर वाहने जास्त असतात. त्यामुळे आम्ही याचे काम का करावे ? असा प्रश्न एसटी प्रशासनाचा असतो. हा मार्ग भले कोणाच्याही मालकीचा असो किंवा नसो, नियोजन किंवा स्थानिक आमदारांच्या विकास निधीमधून या रस्त्याचे काम होऊ शकते. महाड नगरपालिकेच्या डीपीमध्ये महाड बसस्थानकाच्या बाजूने रस्त्याची तरतूद आहे. मात्र या ठिकाणी बांधण्यात आलेली बेकायदेशीर बांधकामे व अतिक्रमण हटविण्याची हिंम्मत महाड नगरपालिकेच्या व्यवस्थापनात नाही. नगर पालिकेच्या या वीस फुटी मार्गाचे जर काम झाले तर खऱ्या अर्थाने महाड करांसाठी सुखकर होणार आहे. या साठी राजकीय इच्छाशक्ती हवी व त्यासाठी स्थानिक आमदारांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. तसेच असे होणार नसेल तर महाडच्या नागरिकांना आता आंदोलनाशिवाय पर्याय राहिलेला नाही.

हीच अवस्था महाड आगाराच्या वर्कशॉपची आहे. स्पेअर पार्टअभावी गाड्या मोठ्या प्रमाणात नादुरुस्त होत आहेत तर इंधन मिळत नसल्याने बसना खासगी पेट्रोल पंपावर जावे लागत आहे, व याचा प्रवाशांना प्रवासात नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. स्वतः ला कोकणाचे पालक म्हणविणाऱ्या परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासाठी ही शरमेची बाब आहे. महाड बस स्थानकावरील शौचालयाची तर दयनीय अवस्था आहे. महिलांना या शौचालयात जाण्यासाठी अंगावर काटा येत आहे, गैरसोय होत असल्याने महिला प्रवाशांची कुचंबणा होत आहे.





### भाजप पक्षाकडे साकडे

***भाजपच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील बहुतांश आगारांच्या व बसस्थानकाच्या इमारती नव्याने व अद्यावत बांधण्याची सुरुवात केली होती. तेव्हा महाड बसस्थानकाच्या नव्या इमारतीच्या कामाला जोमाने सुरुवात झाली होती. मात्र ठाकरे सरकारच्या काळात गेली दोन वर्षे या बसस्थानकाचे काम रखडले आहे. लवकरच या इमारतीचे काम सुरू करणे गरजेचे आहे. दरम्यान, महाड भाजपादेखील एकूणच समस्यांबाबत आक्रमक होऊ लागली आहे. सेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे सत्ता भोगण्यात मशगुल असल्याने आता केवळ भाजपाकडे लोक आशेने पहात आहेत. तशी मागणीही होत आहे.***



## बदलते तंत्रज्ञान




# व्हर्च्युअल रॅम म्हणजे नेमके काय?

जाणून घेऊया व्हर्च्युअल रॅम म्हणजे काय आणि ती कशा प्रकारे कार्य करते. तसेच स्मार्टफोनमध्ये व्हर्च्युअल रॅम असण्याचे फायदे काय आहेत. याबाबत आज आपण जाणून घेणार आहोत. व्हर्च्युअल रॅम, एक्सपांडेबल रॅम किंवा रॅम विस्तार तंत्रज्ञान हे शब्द नक्कीच तुमच्या ऐकण्यात आले असतील. हे शब्द बोलण्यात किंवा वाचण्यात वेगळे वाटत असले तरी या सर्वांचा अर्थ एकच आहे. तुम्ही मोबाईल फोन्सच्या जाहिरातींमध्ये किंवा बातम्यांमध्ये ऐकले असेल की, असा स्मार्टफोन ८ जीबी रॅमवर लॉन्च करण्यात आला आहे, मात्र तो १३ जीबी रॅमपर्यंत परफॉर्मन्स देईल. या जास्त मिळणाऱ्या ५ जीबी पॉवरला व्हर्च्युअल रॅम किंवा एक्सपांडेबल रॅम असे म्हणतात.

आज जवळजवळ सर्व स्मार्टफोन ब्रँड त्यांचे मोबाईल फोन रॅम विस्तार तंत्रज्ञानाने सुसज्ञ करून लॉन्च करत आहेत. तर जाणून घेऊया व्हर्च्युअल रॅम म्हणजे काय आणि ती कशा प्रकारे कार्य करते. तसेच स्मार्टफोनमध्ये व्हर्च्युअल रॅम असण्याचे फायदे काय आहेत.

मोबाईल फोनमध्ये एखादे ॲप्लिकेशन इन्स्टॉल केले जाते तेव्हा ते इंटर्नल मेमरीमध्ये स्टोअर केले जाते आणि जेव्हा ॲप उघडले किंवा चालविले जातात तेव्हा त्यासाठी रॅमचा वापर केला जातो. म्हणजे जे काही ॲप चालेल ते रॅम मेमरीवर चालेल. एका ॲपवर काम करत असताना अचानक दुसरे ॲप उघडणे आणि नंतर टास्क आणि मल्टीटास्किंग स्विच करणे हे फोनच्या रॅमद्वारेच हाताळले जाते.

फोनमध्ये जितकी जास्त रॅम मेमरी असेल तितकी जास्त जागा मल्टीटास्किंगसाठी मिळेल आणि सर्व प्रकारची कामे सुरळीतपणे चालतील. आजकाल हेवी गेम्स आणि मोठमोठे ॲप येत आहेत, ज्यांना काम करण्यासाठी जास्त जागा लागते आणि त्यांच्या सिस्टम फाइल्सही मोठ्या आहेत. व्हर्च्युअल रॅम तंत्रज्ञानाचा वापर अशा अनेक ॲप्लिकेशन्सना भरपूर मेमरी देण्यासाठी केला जातो, जे आवश्यकतेनुसार फोनच्या अंतर्गत स्टोरेजचा वापर त्याच्या प्रक्रियेसाठी करतात.

# रक्तदान करून जगाचे स्पंदन कायम ठेवा!

१४ जून जागतिक रक्तदाता दिवस हा ए, बी, ओ या रक्तगटाचे जनक कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

हा दिवस साजरा करण्याचा उद्देश एवढाच की, लोकांना रक्तदाता म्हणून रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि रक्तदानाबद्दल समाजात असलेली भिती याविषयी गैरसमज दूर करणे हा आहे. एक सामान्य व्यक्ती रक्तदान करुन दुसऱ्याचा जीव वाचवू शकतो. ज्या रक्तदात्यांनी रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदान केलेले असते. त्यांच्या प्रति आभार व्यक्त करण्यासाठी हा दिवस जागतिक रक्तदाता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

हे एकजुटीचे कार्य आहे, या प्रयत्नात सामील व्हा आणि अनेकांचे जीवन वाचवा. हे या वर्षाचे शासनाचे घोषवाक्य आहे. एखाद्या व्यक्तीला रक्ताची गरज असल्यास आणि तिला वेळेवर रक्त मिळाल्यास त्या व्यक्तीचे प्राण वाचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य रक्त करते. म्हणूनच वेळोवेळी रक्तदात्यांना रक्तदान करण्याचे आवाहन केले जाते, ज्यामुळे गरजू व्यक्तीचे प्राण वाचविले जाऊ शकतील.

रक्तदाता हा रुग्णांसाठी नेहमी आशेचा किरण ठरला आहे. रक्त हे कृत्रिमरीत्या तयार होत नाही किंवा कुठल्याही कारखान्यात तयार होत नाही. ते तयार होते तुमच्या आमच्या मानवी शरीरात. यासाठी आपण रक्तदाता म्हणून स्वतःहून रक्तदान करणे महत्त्वाचे ठरते. रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे.

रक्तदानामुळे आज हजारो-लाखो लोकांना जीवनदान मिळते. त्यामुळे रक्तदान हे जीवनदान, तसेच महादान असेही म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मात्र, आजही समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. रक्तदात्याला रक्तदानासाठी प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४ पासून जागतिक आरोग्य संघटनेकडून हा कार्यक्रम सर्वप्रथम दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, (डब्लू एच ओ) रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशनच्या वतीने सुरक्षित रक्तदान करण्यासाठी जनतेत जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला.




### निमित्त

डॉ.कार्ल लँडस्टेनर यांचे कार्य या प्रमाणे- डॉ.कार्ल लँडस्टेनर (ऑस्ट्रेलिया) यांनी रक्तातील प्रतिजन व प्रतिद्रव्ये या प्रथिनांच्या आधारावर रक्ताचे वेगवेगळे घटक तयार केले. इ.स.१९००मध्ये कार्ल लँडस्टेनर यांनी ए, बी, ओ लावला. तर चौथा एबी रक्तगटाचा शोध डिकास्टेलो आणि स्टर्ली यांनी १९०२मध्ये लावला. १९०९मध्ये पोलिओ व्हायरसचा शोध लावला.

सन १९३०मध्ये कार्ल लँन्डस्टेनर यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आपणास सर्व साधारणपणे ए, बी, एबी, ओ हे चार मुख्य गट माहीत आहेत. त्यात आर एच म्हणजेच रहीसस या घटकामुळे निगेटीव्ह पॉझिटीव्ह असे दोन प्रकार पडले. ज्यामध्ये आर एच आहे ते सर्व आरएच पॉझिटीव्ह व ज्यात आर एच नाहीत ते आर एच निगेटीव्ह. पुढे रहीसस माकडाच्या रक्तामध्ये एक घटक सापडला त्यावरुन मानवी रक्ताचा त्या घटकासाठी अभ्यास केला गेला आणि मानवी रक्तातही हा घटक सापडला त्याला आर एच नाव देण्यात आले. रहीससचे आर एच हे संक्षिप्त रुप आहे. सन १९३९मध्ये अलेक्झांडर विनर यांनी हे संशोधन केले.

ए, बी, एबी, ओ या रक्तगटानंतर ५ व्या प्रकारच्या ब्लड ग्रुपचे नाव आहे. बॉम्बे ब्लड ग्रुप याला ओएच म्हणून देखील ओळखले जाते. या ब्लड ग्रुपचा शोध १९५२ मध्ये वाय. एम. भेंडे नावाच्या डॉक्टरांनी पूर्वीच्या बॉम्बेमध्ये अर्थात आताच्या मुंबई मध्ये लावला होता. म्हणून त्याला बॉम्बे ब्लड ग्रुप हे नाव पडले. जागतिक लोकसंख्येपैकी केवळ ०.०००४ टक्के नागरिकांचा 'बॉम्बे ब्लड ग्रुप' आहे. देशात याचे अंदाजे १७९ लोक असून मुंबईमध्ये ३५ ते ४० जण सापडतात. त्यामुळे हा रक्तगट असणाऱ्यांनी ऑनलाइन कम्युनिटीवर रक्तगटाविषयी माहिती अपडेट करणे आवश्यक आहे. तातडीची गरज म्हणून रक्त लागल्यास bombaybloodgroup.org या संकेतस्थळाला भेट द्यावी अथवा sankalp. admingmail.com यावर भेट द्यावी.

**-हेमकांत सोनार, रक्तपेढी तंत्रज्ञ,**
**जिल्हा शासकीय रक्तपेढी,अलिबाग**

(छाया : सुधीर नाझरे)

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : वटपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला बाजारपेठा विविध साहित्यांनी फुलून गेल्या होत्या. मुरुड बाजारपेठेत आंबे, फणस, करवंद, केळी अशी विविध फळे दाखल झाली होती. या वेळी महिलांनी खरेदीसाठी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले.**

## आरोग्य प्रहर



# मुलांमधील साखरेचा धोका वेळीच ओळखा!

गेल्या तीस वर्षांमध्ये भारतात मधुमेहाच्या घटनांमध्ये अपवादात्मक वाढ झाली आहे. टाइप एक डायबेटिस किंवा इन्सुलिनवर अवलंबून राहावे लागणारे मधुमेह असलेल्या मधुमेही रुग्णांसंदर्भात देश जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अलिकडील अहवालांनुसार असे निदर्शनास आले आहे की, टाइप एक डायबेटिस हा १४ वर्षांखालील मुलांमध्ये आढळून येत आहे.

**टाइप एक डायबेटिस म्हणजे काय?**

हा ऑटोइम्यून आजार आहे, जो प्रपाचिक पिंडाला इन्सुलिन निर्माण करण्यास प्रतिबंध करतो. इन्सुलिन हे एक हार्मोन आहे, जे पेशींमध्ये ग्लुकोज जाण्यास आणि पेशींना ऊर्जा देण्यास मदत करते. इन्सुलिनशिवाय शर्करा रक्तामध्ये राहते. हा गंभीर आजार (आजीवन राहणारा) आहे. या मुळे दररोज औषधी, इन्सुनिल शॉटस् व रक्तातील शर्करेचे मॉनिटरिंग आवश्यक असते. टाइप एक डायबेटिस मुले व प्रौढ व्यक्ती अशा दोघांना होऊ शकतो.

**याला कारणीभूत घटक-**

टाइप एक डायबेटिसचे कारण अज्ञात आहे, काही ज्ञात घटक आहे, फॅमिली हिस्ट्री, आनुवंशिक व विशिष्ट विषाणू, जे आयलेट पेशींची ऑटोइम्युन क्षमता वाढवतात, त्यामुळे आयलेट पेशी नाश पावतात. तसेच रक्तामध्ये थोडीशी शर्करा वाढलेली मुले वैद्यकीय तपासणीसाठी येत नाहीत. ज्याचे दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. टाइप एक डायबेटिसच्या लक्षणांची सुरुवात सामान्यत: सौम्यपणे होते आणि स्वादुपिंड कमी-कमी इन्सुलिन निर्मिती करू लागल्यानंतर अधिक तीव्र होतात.

**काय आहेत याची लक्षणे?**

सतत तहान लागणे. वारंवार लघवी होणे. खूप भूक लागणे. झोपेची गुंगी येत राहणे. यासाठी नियमितपणे रक्तातील शर्करेची तपासणी करा. मुलांना शारीरिक व्यायामामध्ये गुंतवा. संतुलित आहार द्या असे डायबेटिक असो.ऑफ इंडियाचे सचिव डॉ. अनिल भोरस्कर यांनी म्हटले आहे.

# माथेरान घाटातील दगड, चिखल काढण्याचे काम सुरू


(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमधील सखाराम तुकाराम पॉईंट ते अमनलॉज दरम्यानच्या रस्त्यावर पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणात चिखल झाला. मात्र नगर परिषदेने यारस्त्यावरवरील चिखल तातडीने काढून टाकल्याने नागरिकांसह पर्यटकांना दिलासा मिळाला आहे.

पहिल्याच पावसात माथेरानमधील सखाराम तुकाराम पॉईंट ते अमनलॉज परिसरातील रस्त्यांवर चिखल झाल्याने नागरिकांना तसेच पर्यटकाना चिखल तुडवत ये-जा करावी लागत होती. शनिवार, रविवार असल्याने पर्यटक मोठ्यात प्रमाणात माथेरानला आले होते.

ही बाब येथील प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्परता दाखवत नगर परिषदेच्या माध्यमातून चिखल काढून रस्ता चिखल मुक्त केला आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळला असून रस्त्यावरून चालणे सुलभ झाले आहे. नागरिकांनी मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांचे आभार मानले आहेत.


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-माथेरान घाटरस्ता आणि रेल्वेमार्गाच्या बाजूला गतवर्षी पावसाळ्यात दरड कोसळली होती. त्यावेळी झाडांना अडकून राहिलेले धोकादायक दगड रेल्वे प्रशासनाकडून काढले जात आहेत.

२०२१ च्या अतिवृष्टीत माथेरान घाटातील वॉटर पाइप रेल्वे स्थानकाच्या वरच्या भागात मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन दरडग्रस्त भाग येथील मार्गात आडवा झाला होता. त्यामुळे येथील मार्ग बंद झाला होता. रस्त्याच्या कडेला असलेली संरक्षक भिंतही दरडीसोबत वाहून गेली होती. सार्वजनिक बांधकाम विभागने येथील रस्त्यावर आलेला दरडीचा भाग जेसीबीच्या सहाय्याने हटविला होता. मात्र काही महाकाय दगड जेसीबीनेही जागचे हलत नसल्याने ते रस्त्याच्या बाजूलाच अडकून राहिले होते.

आता पावसाळा आल्याने मध्य रेल्वेने नेरळ-माथेरान घाटातील धोकादायक दरडी हटवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यानुसार २०२१ च्या अतिवृष्टीत नेरळ-माथेरान घाटातील वॉटर पाइप रेल्वे स्थानकाच्या वरच्या वळणावर झाडाला अडकलेला महाकाय दगड फोडण्याचे काम रेल्वेने सुरू केले आहे.

## जि. प. शाळांमध्ये बुधवारी प्रवेशोत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा बुधवार (दि. १५) पासून सुरू होत आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून बुधवारी शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम साजरा करण्यात येणार आहे. सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामध्ये प्रवेशीत होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

शाळापूर्व दिवशी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांसह शिक्षकांचे शाळेत आगमन होणार आहे. प्रवेश पात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रवेशपात्र बालकांची यादी लाऊडस्पीकरवर घोषित करून शैक्षणिक पदयात्रा व शिक्षकांच्या गृहभेटी व सरपंच, गावकरी, व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचतगट, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वांच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे. शाळेचा परिसर गावकऱ्यांच्या सहाय्याने स्वच्छ करून सडा-रांगोळी व पानाफुलांनी सुशोभित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व शिक्षक शाळेत उपस्थित राहणार आहेत. बालकांची प्रभातफेरी काढण्यात येणार असून पुस्तक दिन साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थी वर्षभर १०० टक्के उपस्थित राहण्यासाठी, एकही विद्यार्थी शाळेबाहेर राहणार नसल्याची प्रतिज्ञा देण्यात येणार असून १०० टक्के उपस्थितीसह शिकवण्यास प्रारंभ होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांचे रूप पूर्णपणे बदलून गेले आहे. डिजिटल क्लासरूम्स, कृतीयुक्त अध्ययन, विविध खेळ, सहशालेय व अभ्यासपूरक ज्ञानरचनावादी उपक्रम, याचबरोबर मूल्य शिक्षणावर विशेष भर, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष, १०० टक्के प्रशिक्षित उच्च शिक्षित शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांना शाळेत मोफत प्रवेश, मोफत गणवेश, मोफत मध्यान्ह भोजन, उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्ती, संगणक शिक्षण या सुविधांचा लाभ दिला जातो.

बुधवारी ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेण्याचे तसेच प्रवेशोत्सवात सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## कर्जत रेल्वे पोलीस सुरक्षा दलाच्या सतर्कतेमुळे तरुणीचे वाचले प्राण

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या सिंहगड एक्सप्रेसमधून प्रवास करणारी एक तरुणी बेशुद्ध झाली. हे समजल्यानंतर कर्जत स्थानकात गाडी थांबताच रेल्वे पोलीस व सुरक्षा दलाच्या महिला कर्मचाऱ्यांनी तिला सिंहगडमधून उतरवून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे तिच्यावर उपचार करून नंतर तिला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

बदलापूर येथे राहणारी रोहिणी अशोक कटमनी ही तरुणी शनिवारी पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या सिंहगड एक्सप्रेसने प्रवास करीत होती. ही तरुणी कर्जत रेल्वे स्थानक येण्यापूर्वी बेशुद्ध झाली होती. ही गोष्ट प्रवाशांनी तिकीट तपासणीसांच्या निदर्शनास आणून दिली. तिकीट तपासणीसांनी लगेचच कर्जत रेल्वे स्थानक व्यवस्थापकांशी संपर्क साधला. ही गाडी कर्जत रेल्वे स्थानकात येताच रेल्वे पोलीस ठाण्याच्या महिला कर्मचारी गावडे व आशा तायडे तसेच रेल्वे सुरक्षा दलाच्या महिला कर्मचारी मंजू विश्वकर्मा यांनी त्या तरुणीला गाडीतून खाली उतरवून पोलीस निरीक्षक संभाजी यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेले. तेथे डॉ. चवरे यांनी तातडीने उपचार सुरू केले. त्यानंतर तीन-चार तासाने ही तरुणी शुद्धीवर आली.

रोहिणी शुद्धीवर आल्यानंतर तिच्या मोबाइलवरून तिची आई चन्नमा कटमनी आणि कुटुंबियांशी संपर्क साधला व तिला त्यांच्या ताब्यात देण्यात आले. रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेमुळे या तरुणीचे प्राण वाचले. रोहिणीचे प्राण वाचविणाऱ्या रेल्वे पोलीस व रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कटमनी कुटुंबाने आभार मानले.





## कर्जतमधील जि. प. शाळांना मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध

**कर्जत : बातमीदार**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत कर्जत गटातील मराठी, उर्दू आणि सेमी इंग्रजी या माध्यमाच्या शाळांना २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी रायगड जिल्हा परिषदेकडून मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहेत. गटशिक्षणाधिकारी सुरेखा हिरवे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील ३२४ शाळांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत वाटप करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेकडून गटशिक्षणधिकारी सुरेखा हिरवे यांच्याकडे पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहेत. कर्जत शहरातील कन्या शाळेमध्ये गटशिक्षणधिकारी सुरेखा हिरवे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात राम एनकर, सुनील राणे या विद्यार्थ्यांना या पाठ्यपुस्तक संचांचे मोफत वाटप केले. कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद, शासकीय आश्रमशाळा व खाजगी अनुदानित अशा मिळून एकूण ३२४ शाळांना या वेळी मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.






**खोपोली नगरपरिषद**

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र.के.एम.सी./मिळकत विभाग/९९२ दिनांक :- १३/०६/२०२२

**शुद्धीपत्रक**

राम प्रहर, रायगड आवृत्ती दि. ११/०६/२०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या (जा.क्र.के.एम.सी./मिळकत विभाग/९४१ दि. १०/०६/२०२२) जाहिरातीमधील ओळ क्र. ७ मध्ये सुधारणा करण्यात येत असून फॉर्म फी दि. १३/०६/२०२२ रोजी ऐवजी फॉर्म फी दि. २३/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारली जाईल असे वाचावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**


## कर्जत-कल्याण राज्यमार्गालगत मातीचा भराव अन् तारेचे कुंपण

### ममदापूर ग्रामपंचायतीकडून गटार मोकळे करण्याच्या सूचना

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील ममदापूर ग्रामपंचायत हद्दीमधून जाणाऱ्या कर्जत- कल्याण राज्यमार्गालगत मातीचा भराव व तारेचे कुंपण घालण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्याच्या कडेला असलेले गटार बंद झाले आहे. दरम्यान, मातीचा भराव बाजूला करून गटार खोदून द्यावे, अशा सूचना ममदापूर ग्रामपंचायतीने संबंधित जमीन मालकाला देण्यात आल्या आहेत.

कर्जत-कल्याण रस्ता ममदापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीतून जातो. या भागातील रस्त्याच्या कडेला असलेल्या सर्व्हे नंबर १७४ ही जमीन आहे. त्यातील हिंसा नंबर ४ मध्ये गेल्या महिनाभरासून मातीचे उत्खनन सुरु आहे. तसेच रस्त्याच्या बाजूला मातीचा भराव करून काटेरी कुंपण घालण्यात आले आहे. त्याबाबत स्थानिक रहिवासी ॲड. गजानन डुकरे यांनी आवाज उठविला आहे.

कर्जत-कल्याण राज्यमार्गाच्या कडेला करण्यात आलेल्या मातीच्या भरावामुळे रस्त्याच्या बाजूचे गटार बंद झाले आहे. त्यामुळे पावसाळ्यात दिव्यादिप हॉटेलपासून येणारे सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहून जाणार आहे.

> **ग्रामपंचायत हद्दीमध्ये रस्त्याच्या बाजूला असलेले गटार मातीचा भराव टाकताना बुजले आहे. पावसाळा जवळ आल्याने हे गटार तात्काळ खोदून देण्याचे संबंधीतांना कळविले आहे. त्यांनी गटार खोदून दिले नाही त्यानंतर कारवाई केली जाईल.**
> **-संजय राठोड, ग्रामविकास अधिकारी, ममदापूर, ता. कर्जत**

> **कर्जत-कल्याण रस्त्याच्या बुजविण्यात आलेल्या गटारांची पाहणी करून संबंधितावर कारवाई करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्यासाठी स्थळ पाहणी महत्त्वाची असल्याने आधी पाहणी केली जाईल.**
> **-संजीव वानखेडे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत**





या बाबत स्थानिकांनी ममदापूर ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या असून रस्त्याचे जुने गटार पुन्हा खोदून देण्याची मागणी केली आहे.

## रोटरी क्लब ऑफ रोहाच्या अध्यक्षपदी सुरेंद्र निंबाळकर

**रोहे : प्रतिनिधी**





रोटरी क्लब ऑफ रोहा या सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षपदी सुरेंद्र निंबाळकर तर सेक्रेटरीपदी उद्योजक सचिन शेडगे आणि खजिनदारपदी विदुला परांजपे यांची यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

रोटरीचे पदाधिकारी व सदस्य यांच्या सहकार्याने या वर्षी मॅरेथॉन तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्याचा मनोदय नवनिर्वाचीत अध्यक्ष सुरेंद्र निंबाळकर यांनी या वेळी व्यक्त केला.

रोटरी प्रांतपालांच्या प्रमुख उपस्थितीतीत शुक्रवारी (दि. १७) होणाऱ्या कार्यक्रमाात नवनिर्वाचित पदाधिकारी पदभार स्वीकारणार आहेत, अशी माहिती देण्यात आली.


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

जा.क्र. : कुबनप/साबां/४९४४/२०२२-२३ दिनांक :- १३/०६/२०२२

**शुद्धीपत्रक**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना कार्यक्रम सन २०२१-२२ करिता मंजूर ५ कामांकरिता जाहीर ई-निविदा सूचना क्र. ३९/२०२२-२३ पत्र क्र.कुबनप/साबां/४५७९/२०२२-२३ दि. ०१/०६/२०२२ अन्वये प्रसिद्ध केलेली आहे. सदर कामांकरिता दि. १०/०६/२०२२ रोजी आयोजित केलेल्या निविदा पूर्व बैठकीत ठेकेदाराने मागणी केलेल्या पत्रान्वये व शासन निर्णयानुसार खालील बदल करण्यात येत आहे.

१) सदर कामांसाठी कुबनप हद्दीपासून २० कि.मी. अंतरापर्यंत स्वतःच्या मालकीचा सिमेंट काँक्रीट प्लांट व मशिनरी असणे बंधनकारक आहे.
२) निविदेत प्रस्तावित कामाप्रमाणे शासकीय संस्थेकडे काम केल्याचा सक्षम अधिकारीचा अनुभव दाखला असणे बंधनकारक आहे.

निविदेबाबतचा केलेला बदल नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यानुसार कागदपत्रे सादर करून Online निविदा सादर करणे आवश्यक राहील तसेच सदर निविदेतील इतर मजकुरात किंवा दिनांकात कोणताही बदल नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(योगेश गोडसे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**


## रायगड पोलीस दलाच्या ताफ्यात ४२ नवीन वाहने

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या ताफ्यात सोमवारी (दि. १३) ४२ नवीन वाहने दाखल झाली. त्यामध्ये २० चारचाकी तर २२ दुचाकींचा समावेश आहे. यासाठी १ कोटी ८१ लाख ५० हजार रुपये इतका निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आला आहे.

पोलीस मुख्यालयाच्या आवारात झालेल्या या कार्यक्रमास पालकमंत्री, स्थानिक आमदार, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी जे. डी. म्हेत्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दयानंद गावडे आदी उपस्थित होते.


**JOB VACANCY**

**ST WILFRED's SCHOOL CBSE & STATE BOARD (PANVEL)**
**Teachers for Pre Primary & Primary Section**
**Qualification : D.Ed & B.Ed With Experience**

**ST WILFRED's INSTITUTE OF PHARMACY**
**Position : Assistant Professor**

**CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ INSTITUTE OF TECHNOLOGY**
**Position : Civil Engineer**

**Call : 9552700456 Mail - stwhr.mis@gmail.com**

**Walk in interview on Wednesday**
**15th June 2022**

**Near Shedung Toll Plaza, Old Mumbai Pune Highway, Navi Mumbai, Maharashtra - 410206**

## निवडक

### कोकणात ७१.५ मिमी पावसाची नोंद



**नवी मुंबई :** कोकण विभागात सोमवारी (दि. १३) सरासरी ६.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३.५ मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आतापर्यंत एकूण ७१.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तर ठाणे-२.१ मि.मी., पालघर-०.०मि.मी, रायगड-३.८ मि.मी., रत्नागिरी-६.१ मि.मी., सिंधुदुर्ग-१३.५मि.मी. अशी जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी आहे.

### लोकशाही दिनी दोन अर्ज निकाली

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन सोमवारी कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी या वेळ उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १५ असून सोमवारी आलेल्या अर्जांची संख्या तीन असे एकूण प्राप्त अर्ज १८ होते. त्यापैकी सोमवारी दोन अर्ज निकाली काढण्यात आले. तर १६ तक्रारी प्रलंबित आहेत. लोकशाही दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरोना प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आल्या होत्या, अशी माहिती कोकण विभागाचे उपसंचालक (माहिती) यांनी दिली.

# दुर्घटनाग्रस्त नागरिकांची वास्तव्यासाठी फरफट

## नवी मुंबईत संक्रमण शिबिराचा अभाव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

तुटलेल्या भिंती, तडे गेलेले स्लॅब, पायऱ्या चढताना हलणारा जिना, कधीही कोसळेल अशा स्थितीतील सिडकोनिर्मित इमारती असताना आता खासगी इमारतींनीही अवस्थाही तशीच झाली आहे. १९९० मध्ये बांधण्यात आलेली इमारती कुचकामी ठरल्यामुळे शहरातील नागरिकांवर भितीखाली वावरत आहेत. नवी मुंबईत संक्रमण शिबिरे नसल्यामुळे दुर्घटनाग्रस्त नागरिकांची वास्तव्यासाठी फरफट होताना दिसते.

नेरूळ सेक्टर १७ येथील जिमी पार्क सोसायटीतील एका इमारतीचे पाच मजल्यांवरील स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेतील तब्बल २२ कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. मध्यम उच्चभ्रू वर्गातील हे सर्व कुटुंब धोकादायक अवस्थेत घर असल्यामुळे



आज उघड्यावर संसार करण्याच्या अवस्थेत आले आहेत. शनिवारी घडलेल्या दुर्घटनेनंतर महापालिकेने या इमारतीमधील कुटुंबांना सुरुवातीला महापालिकेच्या अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय इमारतीमध्ये हलवले होते, परंतु त्याठिकाणी राहण्याजोगे जागा नसल्यामुळे महापालिकेलाही रातोरात जागेची शोधाशोध करावी लागल्याने नवी मुंबई शहरातील संक्रमण शिबिराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. शहरात जर मुंबईच्या धर्तीवर संक्रमण शिबिर असती, तर आज या लोकांचे या शिबिरातील सदनिकांमध्ये तात्पुरती व्यवस्था महापालिकेला करता आली असती. वाशीतील जेएन- वन आणि जेएन - टू प्रकारातील सिडकोनिर्मित इमारतींची पडझड सुरू झाल्यानंतर आता याठिकाणी खासगी विकासकांमार्फत पुनर्विकासाचे काम सुरू झाले आहे. सर्वांत पहिले येथील रहिवाशांच्या वास्तव्यासाठी संक्रमण शिबिराची ओरड सुरू झाली, परंतु संक्रमण शिबिराकडे केवळ राहण्याचा एक पर्याय म्हणून बघितल्याने सत्ताधाऱ्यांसहित प्रशासनानेही या मुद्द्याला महत्त्व दिले नाही.

शहरात केव्हाही पडतील अशा २० पेक्षा जास्त अतिधोकादायक वर्गातील इमारती आहेत. या इमारतींसोबतच १९८५ ते ९० च्या काळात झालेल्या खासगी विकासकांच्या इमारतीचे स्लॅबही आता कोसळायला लागले आहेत. नवी मुंबई आता जुनी होऊ लागली आहे. शहराला ३० वर्षांपेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. तसेच शहरात तयार केलेल्या इमारतीही आता जुन्या होत आहेत. अशा परिस्थितीत शहरात संक्रमण शिबिरांची गरज असल्याचे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

### जिमी पार्कमधील कुटुंबांचे स्थलांतर

**जिमी पार्क सोसायटीतील स्लॅब कोसळलेल्या इमारतीमधील सुरुवातील १२ कुटुंबांची महापालिकेने बहुउद्देशीय इमारतीमध्ये व्यवस्था केली होती. परंतु राहण्याजोगे जागा नसल्यामुळे या कुटुंबांची आता वाशीतील राजस्थान आणि मध्यप्रदेश भवनात व्यवस्था केली आहे. या कुटुंबांत आणखीन काही कुटुंबीयांची भर पडली असून त्यांची संख्या १५पर्यंत पोचली आहे.**

# मार्केटमध्ये स्थानिक विक्रेत्यांना स्थान द्या; भाजपची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अखत्यारित येत असलेल्या ऐरोलीतील मच्छी व भाजी मार्केटमध्ये स्थानिक विक्रेत्यांना गाळे देण्यात यावे, अशी मागणी भाजपच्या राहूल शिंदे यांनी केली आहे.

ऐरोली स्मशानभूमीच्या पडीक जागेत कुठलेही अतिक्रमण न होऊ देता पालिकेने ऐरोली गाव, सेक्टर १९/२० च्या नागरिकांचा विचार करता त्याठिकाणी मासळी व भाजी मार्केट बांधले आहे. हे मासळी व भाजी मार्केट ऐरोली गावठाणमध्ये येते. गावठाणमधील काही स्थानिकांनी वर्षांपूर्वी त्यांची ही जागा गावातील स्मशानभूमीसाठी ग्रामपंचायतीला सामाजिक जाणिवेतून दिली होती. पालिकेची स्थापना झाल्यावर कालांतराने ही जागा ग्रामपंचायतीकडून महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आली ग्रामस्थांचा त्याग पाहता स्थानिकांना या मच्छी व भाजी मार्केटमध्ये ओटे व गाळे मिळावेत, अशी मागणी शिंदे यांनी आयुक्त बांगर यांच्याकडे केली आहे.

या जागेवरील सर्व फेरीवाले स्थानिक नसून (ऐरोली गावठाण व सेक्टर १९/२०) आजूबाजूच्या झोपडपट्टीत राहणारे आहेत. जे त्यांचा उदरनिर्वाह से.१९/२० व आजूबाजूच्या झोपडपट्टीमध्ये काही विकून करतात. गावठाणामध्ये अनेक स्थानिक आज मासळी विकतात. त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या होड्या देखील आहेत. अनेक स्थानिक ठाणे कळवा ऐरोली या ठिकाणी या होड्यातून मिळणारी मासळी विकत घेऊन किरकोळ मासळी विकण्याचा व्यवसायसुद्धा करतात.

मासळी विक्री बरोबर आमचे स्थानिक भाजी विक्री, भाकरीचा व्यवसाय, वडापाव त्याच बरोबर सुकी मासळी सुद्धा आपल्या घरातून किंवा घराच्या बाहेरच्या ओट्यावरून विकतात व आपला उदरनिर्वाह चालवतात. त्याच बरोबर से.१९/२० मधील काही नागरिकांनीसुद्धा कोरोना काळात आपला व्यवसाय गमावला आहे. आजही काही जण आपल्या घरातून पापड, लोणचे, कपडे त्याच बरोबर काही आमच्या माता भगिनी रस्त्यावर बसून आपले सामान विकत आहेत.

या स्थानिक विक्रेत्यांना मासळी व भाजी मार्केटमध्ये प्राधान्य द्यावे जेणेकरून त्यांचा व्यवसाय वाढण्यात मदत होईल. त्यांना एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्राहकसुद्धा उपलब्ध होतील. जे काही दलाल बाहेरील झोपडपट्टीमधील अनधिकृत लोकांना हे गाळे किंवा ओटे देण्यास प्रयत्नशील आहेत त्यांच्यावर संबंधीत परवाना व मालमत्ता विभागाशी चर्चा करून त्वरित थांबावे व स्थानिक गावठाण व सेक्टर १९/२० मधील लोकांना प्राधान्य द्यावे. सदर मासळी व भाजी मार्केटला कोणत्याही व्यक्तीचे नाव न देता ऐरोली ग्रामस्थांच्या मागणीनुसार ऐरोली कोळीवाडा मासळी व भाजी मार्केट असे नाव देण्यात यावे, अशा विविध मागण्या शिंदे यांनी केल्या आहेत.

# 'जन्म-मृत्यू नोंद संगणकीकृत करावी'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरातील ग्रामपंचायतीचे सर्व दस्तऐवज महापालिकेकडे सुपूर्द करण्यात आले आहेत; परंतु काही जन्म व मृत्यूच्या नोंदी संगणकीकृत करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच जन्म व मृत्यूसंबंधी दस्तऐवज मिळविण्यासाठी न्यायप्रक्रियेतून जावे लागत आहे. याबाबत पालिका स्थापनेपासूनचे जन्म मृत्यूसंबंधी माहिती संगणकीकृत करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मंगेश म्हात्रे यांनी पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.

१९९२ मध्ये नवी मुंबईत २९ गावांत असणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायती महापालिकेत विलीन करण्यात आल्या. त्या वेळी सर्व दस्तऐवज पालिका प्रशासनाला बहाल करण्यात आले. त्यामध्ये जन्म-मृत्यूच्या नोंदणीसंबंधी कागदपत्रेदेखील होती. जन्म-मृत्यूसंबंधी माहिती २०१७ नंतरची माहिती संगणकीकृत करण्यात आली आहे; परंतु २०१७ च्या आधीची माहिती अजूनही संगणकीकृत करण्यात आली नसल्याने प्रमाणपत्र घेताना नागरिकांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. ज्याची संगणकीकृत नोंदणी झाली नाही, ते दस्तऐवज शोधण्यास कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

जन्म व मृत्यू दाखला संगणकीकरण प्रकरणी सर्व विभाग अधिकाऱ्यांना आदेश दिले जातील. त्यानंतर कार्यवाही होईल, असे आश्वासन महापालिका आयुक्तांनी दिल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

# वटपौर्णिमा परंपरा व महत्त्व



सुवासिनी भारतीय परंपरेनुसार सौभाग्यवृद्धीसाठी वटसावित्रीचे व्रत करतात. त्यास आधार सत्यवान-सावित्रीच्या पुराणकथेचा आहे. कथेनुसार सावित्रीने तिच्या पतीचे प्राण परत मिळवण्यासाठी मोठ्या भक्तीने यमराजाला संतुष्ट केले. तिच्या भक्तीमुळे पतीचे गेलेले प्राण परत आले. ज्या वृक्षाखाली सत्यवानाचे प्राण परत आले तो वृक्ष वड होता, तर दिवस ज्येष्ठ पौर्णिमेचा होता, अशी भाविक महिलांची श्रद्धा आहे. म्हणून त्या दिवशी महिला वडाची पूजा करतात. भारतीय संस्कृतीत पातिव्रत्य, पतिनिष्ठा हे मूल्य मोठे म्हणून सांगितले गेले आहे.

आधुनिक व्यक्तिस्वातंत्र्याच्या जमान्यात ते निराधार ठरले आहे. तथापी, भारतीय लोकांना संसारसुखासठी ते महत्त्वाचे वाटते. त्यामुळे तेथे वाङ्मयात, संस्कृतीत पतिव्रतांना मानाचे स्थान आहे. त्यातीलच एक सावित्री, जी आदर्श मानली जाते. एखाद्या सुवासिनीने एखाद्यास वाकून नमस्कार केला असता, तिला 'जन्मसावित्री हो' असा आशीर्वाद देण्याचा प्रघात पूर्वी होता. एकूणच, सावित्री हे भारतीय संस्कृतीत अखंड सौभाग्याचे प्रतीक मानले जाते.

वटपौर्णिमेचे व्रत ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत असे त्रिरात्रव्रत असते. उपवास तीन दिवस करायचा असतो पण, उपवास तीन दिवस करणे शक्य नसल्यास फक्त पौर्णिमेला उपवास करतात. वडाला पाणी घालतात. त्याला प्रदक्षिणा घालून सुताचे वेष्टण करतात. नंतर वडाची पूजा करून स्त्रिया स्वतःच्या सौभाग्यवृद्धीसाठी प्रार्थना करतात. त्या दिवशी सवाष्णीची गहू व आंबा यांनी ओटी भरतात.

नवविवाहितेचे वटपौर्णिमेचे वाण असते. त्याला 'वडवते' असेही म्हणतात. ही वाणे पाच किंवा अकरा असतात. छोट्या सुपलीत हळकुंड, सुपारी, बांगड्या, गळेसर, करंडा, फणी, यथाशक्ती दक्षिणा, तांदूळ, खण-नारळ आणि घरी केलेली उंबरे (ही उंबरे - उंबराच्या झाडाची नाही तर फणसाचा रस, गूळ, तांदुळाचा रवा यांपासून केली जातात) असे घालून पाच किंवा अकरा वाणे तयार करतात. एक वाण सासरी, एक माहेरी व एक वडाच्या झाडापाशी ठेवून पूजा झाल्यावर उरलेली वाणे इतर सुवासिनींना देतात.

वस्तुतः प्राणवायूचे प्रचंड भांडार असलेल्या वडाच्या झाडाचे सान्निध्य सदासर्वकाळ लोकांना लाभावे व आरोग्य प्राप्त व्हावी अशी दूरदृष्टी त्या मागे असावी. वडाची प्रत्येक पारंबी जमिनीपर्यंत जाऊन मूळ वृक्षाला आधार देते. त्यामुळे वृक्षविस्तार मोठा होतो. वड कोणत्याही बाह्य परिस्थितीत स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवतो. दीर्घायुष्याचे प्रतीक असलेला तो वृक्ष औषधीसुद्धा आहे. त्याच्या पानांपासून पत्रावळी-द्रोण करतात. पारंब्यांपासून दोर, केसांसाठी औषध बनवतात. त्या महावृक्षाची सावली घनदाट असते. त्यामुळेच त्या झाडाची पूजा केली जात असावी आणि पुढे, महाभारताच्या वनपर्वात 'सावित्री' या उपआख्यानाची त्याला जोड दिली गेली असावी.

सध्या मात्र ज्या झाडाखाली सत्यवानाला अमरत्व मिळाले त्या झाडालाच घरघर लागल्याचे दिसून येते. वडाची झाडे हद्दपार होऊ लागली आहेत. वटपौर्णिमेच्या सुमारास तर उरल्या-सुरल्या झाडांची पूजेला फांद्या हव्या म्हणून अक्षरशः कत्तल होते. दुसऱ्या दिवशी कचऱ्यात पडलेल्या वडाच्या फांद्या आणि उघडीबोडकी झालेली आसपासची वडाची झाडे पाहून मन विषण्ण होते. पूजा फांदीची अपेक्षित नसून पूजा झाडाची अपेक्षित आहे.


स्त्रीने पूजेच्या निमित्ताने का होईना चार घटका निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन, शांत मनाने, प्रसन्न चित्ताने जास्तीत जास्त ऊर्जा मिळवून ताजेतवाने होणे याला महत्त्व आहे. तिच्या घराच्या जवळपास वडाचे झाड नसेल तर ती वृक्षारोपण करूनही वटपौर्णिमेचा दिवस अथवा सण साजरा करू शकते. आपण निसर्गाचे रक्षक व्हायला हवे, भक्षक नव्हे.

**-स्मिता भागवत**

# तणावमुक्तीसाठी घरगुती मत्स्यालयास प्राधान्य

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दोन वर्षांपूर्वी कोरोना महामारी आल्याने लॉकडाऊनमुळे अनेक जण घरी होते. सतत अनेक दिवस घरात राहिल्याने कोंडमारा होत होता. अशात तणावमुक्ती, करमणुकीसाठी अनेकांनी घरात क्वेरियममध्ये (मत्स्यालय) मासे पाळण्याला प्राधान्य दिल्याचे समोर आले. यामुळे तणाव कमी होऊन सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.



मासे म्हटले की, ते फक्त खाण्यासाठीच नसतात, तर घरात पाळण्यासाठीही असतात, हे गेल्या काही वर्षांतील ट्रेंडमुळे दिसत आहे. घरात कुत्री, मांजरांसह मासे पाळण्याची आवड बहुतेक सर्वांनाच असते. निदान लहानपणी तर नक्कीच. रंगीबेरंगी माशांचे हे जग आपल्यावर कधी गारुड करून जाते, हे समजत नाही. काहींची ही भूल उतरते आणि काहींची मात्र आयुष्यभर साथ देते. दिवसेंदिवस अनेक लोकांनी मासे पाळण्याला प्राधान्य दिले आहे. मत्स्यालय ठेवणे केवळ त्या जागेचे सौंदर्यच वाढवते असे नाही, तर माशांना पाहून मनाला स्फूर्ती मिळते. याचबरोबर एखाद्याला तणाव जाणवतो, तेव्हा मत्स्यालयातील माशांना पोहताना पाहून पूर्णपणे तणाव निवळत असल्याचे जाणवते.

अनेकांना घरात मासे पाळण्याची आवड असते. फिश टँकमुळे घराच्या सजावटीलाही एक वेगळीच शोभा येते. एकाच ठिकाणी सुंदर रंगातील मासे असल्याने लहान मुलेही त्याकडे आकर्षिली जातात. आपला ॲक्वेरियम हा एक निसर्गाचा जिवंत तुकडाच असतो, त्यातले मासे, झाडे आणि पाणीही. मासे पाळण्याचा एक फायदा म्हणजे हा छंद सामान्य माणसाच्या आवाक्यातील गोष्ट आहे. त्याला फारशी जागा लागत नाही, तसेच इतर प्राण्यांइतकी काळजी घ्यावी लागत नाही. वेळच्यावेळी खाणे आणि साफसफाईची काळजी घेतली तर फारसे रोगही होत नसल्याने हा छंद फारसा महाग पडत नाही.

घरात मासे पाळायचे असल्यास गप्पी, झेब्रा फिश, मिकी माऊस प्लेट्टी, निऑन तेट्रा, व्हाईट क्लाऊड माउंटन मिनो, हलेक्विन रासबोरा, सर्पा टेट्रा, पांडा कोरीडोरा, फायर निऑन, वाटाणा पफर, टायगर बार्ब, सोवर्डटेल, जर्मन ब्लू, रेड क्रॉफ फिश, फ्लेम गोरामी, चिनी बार्ब, बेटा मासा, हॉचेट फिश, कॉंगो टेट्रा, बिकन फिश, ब्लॅक फॅटम टेट्रा हे मासे सहज मत्स्यालयासाठी उपलब्ध होतात, ते घरात पाळू शकता.

**आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला निसर्गाच्या जास्त जवळ जाता येत नसल्याने आपण निसर्गालाच आपल्या जवळ आणण्याचा प्रयत्न करू शकतो. कोरोना लॉकडाऊननंतर घरी मासे पाळण्यासाठी मागणी वाढली आहे.**

**-मनीष महानवर, फिश शॉप, मालक**

# सारसोळेमधील राजमाता जिजाऊ उद्यानाचे सुशोभीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

सारसोळे येथील राजमाता जिजाऊ उद्यान सारसोळे सेक्टर ६ मधील उद्यानांस नवी झळाळी येणार आहे. नवी मुंबई मनपाने उद्यानाच्या सुधारणा आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले असून नुतनीकरनात नवीन लॉन, वैविध्यपूर्ण खेळणी आणि इतर आकर्षक बाबींचा समावेश असणार आहे. या कामी भाजपचे माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी पाठपुराव्यास केला असून त्याला यश आले आहे.

नवी मुंबई महापालिका प्रभाग क्रमांक ८५ व ८६ अंतर्गत राजमाता जिजाऊ उद्यान, सेक्टर ६ उद्यान आहे. या उद्यानांची स्थिती कोरोना काळात दयनीय होती. या उद्यानाची सुधारणा करावी, उद्यानातील हिरवन पुनर्निर्मित करावी, खेळणी आणि जलवाहिनी दुरुस्त करावी, सूचना फलक व सुरक्षा रक्षक आदींची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी नगरसेवक सुरज पाटील यांनी मागील वर्षापासून केली होती.

सुरज पाटील यांच्या प्रयत्नास यश आले असून सारसोले सेक्टर ६ मधील राजमाता जिजाऊ उद्यानाच्या दुरुस्ती आणि सुधारणा करण्याच्या कामास सुरुवात होणार आहे. यासाठी नवी मुंबई मनपा सुमारे १८ लाख रुपये खर्च करणार असून राजमाता जिजाऊ उद्यानास आता नवी झळाळी प्राप्त होणार आहे.


## वाचाल तर वाचाल!

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

दैनिक राम प्रहरच्या अंकात नवे पाक्षिक सदर 'वाचाल तर वाचाल!' सुरू झालेले आहे.
या सदरात
साहित्यिकांची आवडती पुस्तके दर महिन्याच्या पहिल्या व चौथ्या रविवारी
आपल्या भेटीला आणत आहोत.
आपला अंक राखून ठेवा...!



# अलिबाग नगर परिषदेत तीन जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, महाड, रोहा, माथेरान, पेण, उरण या नगर परिषदांच्या कार्यालयात प्रभाग आरक्षण निश्चित करण्यासाठी सोमवारी (दि. १३) विशेष सभांचे आयोजन करण्यात आले होते. या आरक्षणाकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले होते. विशेषतः सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने नव्याने आरक्षण कसे पडते, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. सोडत जाहीर झाल्यानंतर काहींनी समाधान व्यक्त केले तर अपेक्षित आरक्षण न पडल्याने काहींचा हिरमोड झाला.

रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले. त्यासाठी अलिबाग नगरपालिका सभागृहात प्रांताधिकारी प्रशांत ढगे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी भाजप, शेकाप, काँग्रेस, शिवसेना आदी पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक, त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अलिबागमधील २० पैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. ती अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित आहे. अनुसूचित जमातीसाठी तीन जागा राखीव आहे. त्यातील दोन जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव आहेत. त्यानुसार १० जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

### अलिबाग प्रभागनिहाय आरक्षण

*प्रभाग क्रमांक १ अ – खुला महिला, १ ब– खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग क्रमांक २ अ– अनुसूचित जमाती महिला,*
*२ ब– खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ३ अ– खुला महिला, ३ ब– खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ४ अ – खुला महिला, ४ ब– खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ५ अ – अनुसूचित जाती महिला, ५ ब – खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ६ अ– खुला महिला, ६ ब – खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ७ अ– खुला महिला, ब ७– खुला सर्व साधारण,*
*प्रभाग ८ अ– खुला महिला, ८ ब – खुला सर्वसाधारण,*
*प्रभाग ९ अ – अनुसूचित जमाती महिला, ९ ब – खुला सर्व साधारण,*
*प्रभाग १० अ – अनुसूचित जमाती सर्वसाधारण, १० ब – खुला महिला.*

## खोपोली पालिकेची आरक्षण सोडत : गम कम, खुशी जादा!

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेचे प्रभाग आरक्षण सोमवारी (दि. १३) जाहीर झाले. एकूण ३१ पैकी तीन जागा अनुसूचित जातीसाठी व एक जागा अनुसूचित जमातीसाठी आरक्षीत करण्यात आली. या वेळी ३१ पैकी १६ महिला सदस्या निवडून येणार असून, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत न निघाल्याने सर्वसाधारण गटातील अनेक इच्छुक उमेदवारांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले तर महिलांची संख्या वाढल्याने काही दिग्गजांना या वेळी आराम मिळणार आहे.

खोपोली नगर परिषद हद्दीत २०११ च्या जनगणनेनुसार ७१ हजार १४१ मतदार असून, त्यापैकी अनुसूचित जाती प्रवर्गातील सहा हजार ७२१, आणि


(छाया : अरूण नलावडे)

अनुसूचित जमाती प्रवर्गातील तीन हजार ६५ मतदार आहेत.

### प्रभाग आरक्षण

*प्रभाग १ अ सर्वसाधारण महिला, २ ब सर्वसाधारण*
*प्रभाग २ अ अनुसूचित जाती महिला, २ ब सर्वसाधारण,*
*प्रभाग ३ अ अनुसूचित जमाती, ३ ब सर्वसाधारण महिला*
*प्रभाग ४ अ सर्वसाधारण महिला, ४ ब सर्वसाधारण प्रभाग ५ अ अनुसूचित जाती महिला, ५ ब सर्वसाधारण,*
*प्रभाग ६ अ सर्वसाधारण महिला, ६ ब सर्वसाधारण*
*प्रभाग ७ अ सर्वसाधारण महिला, ७ ब सर्वसाधारण*
*प्रभाग ८ अ सर्वसाधारण, ८ ब महिला सर्वसाधारण,*
*प्रभाग ९अ अनुसूचित जमाती, ९ ब सर्वसाधारण महिला*
*प्रभाग १० अ सर्वसाधारण महिला, १० ब सर्वसाधारण*
*प्रभाग ११ अ सर्वसाधारण महिला, ११ ब सर्वसाधारण*
*प्रभाग १२ अ सर्वसाधारण महिला, १२ ब सर्वसाधारण*
*प्रभाग १३ अ सर्वसाधारण महिला, १३ ब सर्वसाधारण*
*प्रभाग १४ अ सर्वसाधारण महिला, १४ ब सर्वसाधारण*
*प्रभाग १५ अ सर्वसाधारण महिला, १५ ब सर्वसाधारण*
*१६ अ महिला सदस्य*

## मुरूड नगर परिषदेची प्रभाग आरक्षण सोडत जाहीर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषदच्या २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सोमवारी (दि.१३) सकाळी ११ वाजता नियंत्रण अधिकारी तथा अध्यक्ष नितीन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली व नगर परिषद मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत आरक्षण प्रक्रिया पार पडली.

मुरुड नगर परिषदेची लोकसंख्या १२ हजार २१६ असून यंदा होणाऱ्या निवडणुकीत १० हजार ८७३ मतदार २० नगरसेवक निवडूण देणार आहेत.

या वेळी आण्णा कंधारे, महेंद्र चौलकर, ललीत जैन, मंगेश दांडेकर, स्नेहा पाटील, श्रीकांत गुरव, गिरीश साळी,विजय पैर,स्वप्निल कवळे, आशिष दिवेकर, संदिप पाटील, प्रांजली मकु, मृणाल खोत, प्रमोद भायदे, रूपेश पाटील, आदेश दांडेकर, महेश भगत, जगदीश पाटील, श्रीकांत सुर्वे, मंदाकिनी कासेकर, प्रतिभा गायकर, अरविंद गायकर, विजय भोय, मनोहर पानवलकर, उमेश माळी, पाडुरंग आरेकर, सुधीर पाटील, महेश पाटील, सुधीर पाटील आदिंसह नागरिक उपस्थित होते.

(छाया : संजय करडे)




### प्रभाग आरक्षण

*प्रभाग क्रमांक १ खुला महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक २ खुला महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक ३ खुला महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक ४ महिला खुला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक ४ खुला महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक ५ खुला महिला व सर्व साधारण.*
*प्रभाग क्रमांक ६ खुला महिला व सर्वसाधारण*
*प्रभाग क्रमांक ७ खुला महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक ८ अनु. जमाती सर्वसाधारण व महिला.*
*प्रभाग क्रमांक ९ अनु.जमाती महिला व सर्वसाधारण.*
*प्रभाग क्रमांक १०अनु.जमाती महिला व सर्वसाधारण*




## रोहा पालिकेच्या प्रभाग आरक्षण सोडतीत सारेच नेते खुश

### २० पैकी १० जागा महिलांसाठी राखीव

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषेदेची प्रभाग आरक्षण सोडत सोमवारी (दि. १३) काढण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ओबीसी आरक्षण रद्द झाले आहे. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीची लोकसंख्या आरक्षणासाठी पुरेशी नसल्याने त्यांचे आरक्षण न पडल्याने रोहा नगर परिषेदेची सोडत पहिल्यांदाच विना आरक्षण काढण्यात आली. मात्र महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव असल्याने रोहा नगर परिषदेच्या २० पैकी १० जागा सर्वसाधरण महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रत्येक प्रभागात संधी मिळणार असल्याने सारेच नेते खुष झाले होते.

रोहा नगर परिषदेच्या कै. द. ग. तटकरे सभागृहात सोमवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता प्रांताधिकारी दिघावकर मॅडम आणि मुख्याधिकारी धीरज चव्हाण यांच्या उपस्थित प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली. या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, संजय कोनकर, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, समीर सकपाळ, महेंद्र दिवेकर, जितेंद्र दिवेकर, यशवंत शिंदे, सुभाष राजे, वसंत शेलार, समिक्षा बामणे तसेच अमित उकडे, विघ्नेश भांड, निता हजारे, जैनुदीन लंबाते, मजिद पठाण, अजित मोरे, कादीर रोगे आदींसह सर्व पक्षांचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते. प्रत्येक प्रभागात पहिल्या क्रमांकाची जागा ही सर्वसाधारण महिला तर दुसऱ्या क्रमांकाची जागा सर्वसाधरण प्रवर्गासाठी ठेवण्यात आली.


(छाया : महादेव सरसंबे)

## श्रीवर्धन नगर परिषदेची आरक्षण सोडत जाहीर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

येथील नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२२मध्ये होत असून, त्यासाठी सोमवारी (दि.१३) प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली.

इतर मागासवर्गीय प्रवर्ग (ओबीसी) आरक्षणाचा वाद न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाने या निवडणुका इतर मागासवर्गीय आरक्षण सोडून घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सोमवारी काढण्यात आलेल्या प्रभाग आरक्षण सोडतीमध्ये इतर मागासवर्गीय प्रवर्गाचा समावेश करण्यात आलेला नाही.

श्रीवर्धन नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक दोनमध्ये अनुसूचित जमाती (महिला) असे आरक्षण पडले असून प्रभाग क्रमांक पाचमध्ये अनुसूचित जाती (महिला) हे आरक्षण पडले आहे. तर प्रभाग क्रमांक दहामध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षण पडले आहे. महिलांना ५० टक्के आरक्षण असल्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेच्या दहा जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.

श्रीवर्धन नगर परिषदेचे प्रशासक व मुख्याधिकारी विराज लबडे यांनी प्रभाग आरक्षणा विषयी माहिती दिली.

## माथेरान गिरीस्थान पालिकेची प्रभाग आरक्षण जाहीर

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील माथेरान नगर परिषदच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवारी (दि. १३) प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली. नगर परिषदेच्या एकूण २० पैकी १६जागा सर्वसाधारण, तीन जागा अनुसूचित जाती तर एक जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव झाली आहे. २० पैकी१० जागा महिलांसाठी आरक्षित आहेत.

माथेरान नगर परिषदची सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. सोमवारी नगर परिषदेच्या स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहात उपविभागीय अधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग आरक्षण सोडत काढण्यात आली. या वेळी मुख्याधिकारी सुरेखा भणगे, महसूल अधीक्षक दीक्षांत गोडबोले, सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे आदी उपस्थित होते. त्यांना महसूल अव्वल कारकून नितीन परदेशी, मनोहर गोरेगावकर यांनी सहकार्य केले.

मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी सुरुवातीला आरक्षण सोडतीबद्दल माहिती दिली. त्यात माथेरान पालिकाक्षैत्रात ४३९३ लोकसंख्या असून त्यातील अनुसूचित जातीमधील ६२३ आणि अनुसूचित जमातीमधील १८३ लोकसंख्या आहे. पालिकेच्या १० प्रभागातून २० सदस्य निवडले जाणार आहेत, त्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला आरक्षण सोडत काढण्यात आली. प्रभाग चार, पाच आणि सहामध्ये प्रत्येकी एक जागा अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

प्रणव संतोष ढेबे आणि आर्या शैलेश ढेबे या वीर भाई कोतवाल नगरपालिका शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षण निश्चीत करण्यात आले. या वेळी माथेरानमधील सर्व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

(छाया : संतोष पेरणे)



## कर्जतमध्ये रिक्षाचालकाची मुलगी झाली डॉक्टर!

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद हद्दीतील भिसेगाव सटूआईनगर परिसरातील लक्ष्मण गोविंद कडू यांची मुलगी आरती कडू हिने डॉक्टर पदवी संपादन केली आहे.

आरतीचे वडील व्यवसायाने ईको रिक्षा चालक आहेत. आई गृहिणी, मोठ्या बहिणीचे लग्न झाले आहे.तर भाऊ अंकुश कडू रिक्षा चालक आहेत. कुटुंबाला कोणतीच शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना व आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचा आरतीच्या धाडसी निर्णयाला घरातून पाठबळ मिळाले. परिस्थितीपुढे हार न मानता आरती वैद्यकीय परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. या यशाबद्दल आरतीचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. आरती ही डॉक्टर झालेली भिसेगावातली पहिली मुलगी आहे. त्यामुळे गावकऱ्यांना डॉ. आरतीचा सार्थ अभिमान वाटत आहे. आरतीने तिच्या यशाचे श्रेय तिचे शिक्षक, आई–वडील, मोठा भाऊ अंकुश तसेच त्यांचे मित्र अमोल मानकामे, शरद खराडे, सलीम शेख, राहुल देशमुख आणि अनूप साळवी यांना दिले.


(छाया : विजय मांडे)

## शेडवर डांबर टाकताना कामगाराचा मृत्यू

### वायर कंपनी व्यवस्थापनाविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ढेकू गावामधील सिस्टीमिटीक वायर प्रा. लि या कंपनीच्या पत्र्याच्या शेडवर डांबर टाकण्यासाठी चढलेल्या रफीक नवाज खान (वय ४०, मूळ रा.जालना) या कामगाराचा पंचवीस फुटावरून खाली पडून रविवार (दि. १२) सायंकाळी मृत्यू झाला. या प्रकरणी कामगाराच्या सुरक्षेची खबरदारी घेण्यात हालगर्जीपणा केला असल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आल्याने कंपनी व्यवस्थापनाविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खालापूर तालुक्यातील साजगांव ग्रामपंचायत हद्दीतील ढेकू गावात लोखंडी वायर तयार करणारा सिस्टीमिटीक वायर नावाचा कारखाना आहे. या कारखान्याच्या शेडवर डांबर टाकण्यासाठी रफीक नवाज खान चढला होता. या दरम्यान पत्रा फुटल्याने डांबराच्या बादलीसह रफीक पंचवीस फुटावरून खाली पडला. कंपनी व्यवस्थापकांनी त्याला तातडीने खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात आणले तेथे डॉक्टरांनी रफीक खान याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

या घटनेची माहिती कळताच खोपोली पोलीस ठाण्याचे सहय्यक निरीक्षक हरेष कळसेकर घटनास्थळी पोहले. त्यांनी प्राथमिक तपास करून मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविला. दरम्यान, भरपाई दिल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेण्यास मृताच्या नातेवाईकांनी नकार दिला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी मध्यस्थी करीत मृताच्या कुटूंबाला प्राथमिक तीन लाखाची मदत मिळवू दिली.

या प्रकरणी कंपनी व्यवस्थापक आणि ठेकादाराविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक निरीक्षक हरेष कळसेकर करीत आहेत.


(छाया : अरूण नलावडे)

# अखिल भारतीय खो-खो स्पर्धेत नवी मुंबई पालिका संघ उपविजेता

**नवी मुंबई : बातमीदार**


कर्नाटक राज्य खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने काथनहळी (जि. मंड्या) येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय निमंत्रित व्यावसायिक खो-खो स्पर्धेत नवी मुंबई महापालिका संघाने उपविजेतेपद पटकाविले. वेस्टर्न रेल्वे संघासोबतच्या अंतिम सामन्यात अटीतटीच्या लढतीत नवी मुंबई महापालिका संघ तीन गुणांनी पराभूत झाला.

या स्पर्धेत नवी मुंबई महापालिकेसह दक्षिण मध्य रेल्वे, मुंबई पोलीस, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण बोर्ड, भारतीय रिझर्व्ह बॅक, कर्नाटक राज्य संघ, वेस्टर्न रेल्वे, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका, मध्य रेल्वे, प्रेसिडेंट इलेव्हन, कर्नाटक राज्य असे एकाहून एक बलाढ्य संघ सहभागी होते.

स्पर्धेत अ गटातून नवी मुंबई महापालिका संघाने विजय मिळवित ब गटातील उपविजेता संघ मध्य रेल्वेसोबत उपांत्य फेरीचा सामना खेळला. यामध्ये मध्य रेल्वे संघाने पहिल्या डावात (मध्य पूर्व) नवी मुंबई महापालिकेच्या संघाचे ११ गडी बाद करून ३ गुणाची आघाडी घेतली होती, मात्र मध्यानंतर महापालिका संघाने मध्य रेल्वे संघाचे ११ गडी बाद केले, तर मध्य रेल्वे संघाने ९ गडी बाद केले. त्यामुळे उपांत्य फेरीचा सामना नवी मुंबई महापालिका संघाने ३ गडी राखून जिंकला व अंतिम फेरीत प्रवेश मिळविला.

अंतिम सामना नवी मुंबई महापालिका आणि वेस्टर्न रेल्वे या दोन बलाढ्य संघांमध्ये झाला. निकराच्या लढाईत वेस्टर्न रेल्वे संघ ३ गुणांनी विजयी झाला. त्यामुळे नवी मुंबई महापालिका संघ उपविजेता ठरला. संपूर्ण सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्याबदल नवी मुंबई महापालिका संघातील गजानन शेंगाळ या खेळाडूस दोन दिवस तसेच आकाश साळवे व लक्ष्मण गवस या खेळाडूंना त्या दिवसाचा मानकरी म्हणून वैयक्तिक पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक म्हणून नवी मुंबई महापालिका संघातील अष्टपैलू खेळाडू गजानन शेंगाळ यास वैयक्तिक चषक व रोख पारितोषक देऊन गौरविण्यात आले.

## आयुक्तांकडून कौतुक



अखिल भारतीय खो-खो स्पर्धेत नवी मुंबई महापालिकेच्या संघाने उत्कृष्ट खेळ करून उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी संघातील खेळाडू व प्रशिक्षकांचे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या वेळी क्रीडा विभागाचे उपायुक्त मनोजकुमार महाले, क्रीडा अधिकारी रेव्वपा गुरव व प्रशिक्षक सिद्धराम दहिवडे उपस्थित होते.

# टीम इंडियाची पुन्हा हाराकिरी

**▪ सलग दुसर्‍या सामन्यात द. आफ्रिकेकडून पराभव**



**कटक : वृत्तसंस्था**

फलंदाजांनंतर गोलंदाजांनी केलेल्या निराशाजनक कामगिरीमुळे यजमान भारताला दुसर्‍या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यातही दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करावा लागला. हेन्रिच क्लासनच्या (४६ चेंडूंत ८१ धावा) दमदार खेळीच्या जोरावर आफ्रिकेने हा सामना चार गडी आणि १० चेंडू राखून जिंकला.

कटक येथे रविवारी झालेल्या या सामन्यात भारताने दिलेले १४९ धावांचे आव्हान आफ्रिकेने १८.२ षटकांत गाठले आणि पाच सामन्यांच्या या मालिकेत २-० अशी आघाडी मिळवली. आव्हानाचा पाठलाग करताना आफ्रिकेच्या डावाची अडखळती सुरुवात झाली. भुवनेश्वर कुमारने रीझा हेन्ड्रिक्स (४), ड्वेन प्रिटोरियस (४) आणि रासी व्हॅन डर डसन (१) यांना झटपट बाद करीत आफ्रिकेची ३ बाद २९ अशी स्थिती केली होती, मात्र, क्लासनने कर्णधार टेम्बा बव्हुमाच्या (३० चेंडूंत ३५) साथीने आफ्रिकेचा डाव सावरला. या दोघांनी ६४ धावांची भागीदारी रचली. बव्हुमाला यजुर्वेद्र चहलने माघारी पाठवल्यावर क्लासनला डेव्हिड मिलरची (१५ चेंडूंत नाबाद २०) साथ लाभली. क्लासनने ४६ चेंडूंत सात चौकार आणि पाच षटकारांच्या साहाय्याने ८१ धावांची खेळी केल्यावर त्याला हर्षल पटेलने बाद केले, पण मिलरने एक बाजू लावून धरत आफ्रिकेचा विजय साकारला.

तत्पूर्वी भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १४८ अशी धावसंख्या उभारली. ऋतुराज गायकवाड (१) छाप पाडण्यात अपयशी ठरला. मग इशान किशन (२१ चेंडूंत ३४) आणि श्रेयस अय्यर (३५ चेंडूंत ४०) यांनी दुसर्‍या गड्यासाठी ४५ धावांची भर घातली, मात्र या दोघांनाही चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करता आले नाही तसेच मधल्या फळीतील कर्णधार ऋषभ पंत (५) आणि हार्दिक पांड्या (९) हे फलंदाजही लवकर बाद झाले. यानंतर मात्र अखेरच्या षटकांत अनुभवी दिनेश कार्तिकने (२१ चेंडूंत नाबाद ३०) षटकेबाजी करीत भारताला दीडशे धावांसमीप नेले.

**संक्षिप्त धावफलक**

भारत : २० षटकांत ६ बाद १४८ (श्रेयस अय्यर ४०, इशान किशन ३४, दिनेश कार्तिक नाबाद ३०; आनरिख नॉर्किए २/३६) पराभूत वि. दक्षिण आफ्रिका : १८.२ षटकांत ६ बाद १४९ (हेन्रिच क्लासन ८१, टेम्बा बव्हुमा ३५; भुवनेश्वर कुमार ४/१३) सामनावीर : हेन्रिच क्लासन.

### आशिया पात्रता फुटबॉल स्पर्धा

# भारताची आज हाँगकाँगशी लढत

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आशिया चषक पात्रता फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (दि. १४) भारतीय संघाची लढत हाँगकाँगशी होणार आहे. या सामन्यात हाँगकाँगला नमवत पुढील वर्षीच्या आशिया चषकासाठी पात्र ठरण्याची संधी भारताला आहे.

या स्पर्धेत भारताने शनिवारी अफगाणिस्तानवर २-१ अशी मात केली होती. त्यापूर्वी सलामीच्या लढतीत भारताने कंबोडियावर २-० अशी सरशी साधली होती. घरच्या मैदानावर खेळत असल्याने प्रेक्षकांचा आम्हाला पूर्ण पाठिंबा लाभतो आहे. त्यातच सलग दोन सामने जिंकल्याने आमचा आत्मविश्वास उंचावला असून अखेरच्या सामन्यात हाँगकाँगला पराभूत करण्याचा आम्हाला विश्वास आहे, असे भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्री म्हणाला.



***हाँगकाँगच्या संघानेही दर्जेदार कामगिरी केली आहे, मात्र आम्ही घरच्या मैदानावर खेळत आहोत आणि आम्ही हा सामना जिंकू असा मला विश्वास आहे. आम्हाला प्रेक्षकांचा पूर्ण पाठिंबा लाभेल.***
**-सुनील छेत्री, भारतीय कर्णधार**

कोलकाता येथील सॉल्ट लेक स्टेडियवर झालेल्या भारत-अफगाणिस्तान सामन्याला ४० हजार प्रेक्षकांनी हजेरी लावली होती. हाँगकाँगविरुद्ध भारताला असाच पाठिंबा मिळेल, असेही छेत्रीने नमूद केले.

# बीसीसीआयला आयपीएल प्रसारण हक्कांतून मिळाले ४४,०७५ कोटी

## प्रति सामना १०७.५ कोटी रक्कम निश्‍चित

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या २०२३ ते २०२७ या पर्वांसाठी झालेल्या ई-लिलावात अ व ब पॅकेजसाठी जवळपास ४४ हजार कोटींची बोली निश्चित झाली आहे. टीव्ही प्रसारण हक्कासाठी ५७.५ कोटी, तर डिजिटल हक्कासाठी ५० कोटी निश्चित झाले आहे. यानुसार १०७.५ कोटी प्रती सामना निश्चित झाले आहेत.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे टीव्ही व डिजिटल या प्लॅटफॉर्मसाठी दोन वेगवेगळ्या कंपन्यांनी बाजी मारली आहे. काहींच्या मते टीव्हीचे हक्क सोनी कंपनीने पटकाविले आहेत, तर डिजिटल प्लॅटफॉर्मचे हक्क मुकेश अम्बानी यांच्या व्हायकॉम १८ नेटवर्कने जिंकले आहेत.

या वेळी प्रसारण हक्काचे वर्गीकरण बीसीसीआयने चार गटांमध्ये केलेले आहे. ज्यात प्रत्येक सत्रातील ७४ सामन्यांचा समावेश असेल, मात्र हे सामने प्रसारित करण्याची माध्यमे वेगवेगळी असतील. शिवाय २०२६ आणि २०२७साठी बीसीसीआय सामन्यांची संख्या ९४पर्यंत नेण्याच्या विचारात आहे.

# महाराष्ट्र अग्रस्थानी कायम

**पंचकुला : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने रविवारी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत पाच सुवर्ण, तीन रौप्य आणि पाच कांस्यपदकांची कमाई केली. जलतरणात अपेक्षा फर्नांडिसने दोन सुवर्णपदके जिंकत महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासह तिरंदाजीत साताऱ्याच्या आदिती स्वामीने सुवर्णवेध घेतला, तर टेबल टेनिसमध्ये दिया चितळेने सुवर्णपदक जिंकले.

जलतरणात रविवारी अपेक्षाने ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये ३३.७८ सेकंद अशी वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर तिने २०० मीटर बटरफ्लायमध्येही सुवर्णपदक आपल्या नावे केले. या प्रकारात तिने २:१८.३९ सेकंदाची वेळ नोंदवून भारतातील सर्वोत्तम वेळेची नोंद केली. ४ बाय १०० फ्री स्टाईल रिलेमध्ये मुलांच्या संघाला रौप्यपदक मिळाले. या संघात अर्जुनवीर गुप्ता, ऋषभ दास, उत्कर्ष गौर आणि आर्यन वर्णेकर यांचा समावेश होता.

तिरंदाजीत साताऱ्याच्या आदिती स्वामीने सुवर्ण कामगिरी करताना पंजाबच्या अवनित कौरचा १४४-१३७ असा पराभव केला. अहमदनगरच्या पार्थ कोरडेला मुलांच्या लढतीत आंध्र प्रदेशच्या व्यंकीकडून १४५-१४४ असे अवघ्या एका गुणाने पराभूत व्हावे लागल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. टेबल टेनिसमध्ये मुलींच्या एकेरीत दियाने दिल्लीच्या लतिका नारंगचा पराभव करीत सुवर्ण कमाई केली तसेच सिमरन वर्मा (मुंबई), रशिका होले (सातारा), आदित्य गौड (पुणे), माणिक सिंग (अकोला), सई डावखर (पुणे) यांनी बॉक्सिंगमध्ये कांस्यपदके कमावली.

युवा खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीमुळे महाराष्ट्राने पदकतालिकेतील अग्रस्थान कायम राखले आहे. महाराष्ट्राच्या खात्यावर ४१ सुवर्ण, ३६ रौप्य आणि २९ कांस्य अशी एकूण १०६ पदके जमा आहेत. दुसऱ्या स्थानावरील हरियाणाने महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक पदके मिळवली असली तरी सुवर्णपदकांमध्ये ते पिछाडीवर आहेत. हरियाणाने आतापर्यंत या स्पर्धेत ३९ सुवर्ण, ३४ रौप्य आणि ४२ कांस्य अशी ११५ पदके कमावली आहेत.

# विश्वचषक पॅरानेमबाजी स्पर्धेत भारताच्या अवनीला दुसरे 'सुवर्ण'

**पॅरिस : वृत्तसंस्था**



भारताची युवा पॅरानेमबाज अवनी लेखराने फ्रान्स येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा क्रीडा विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत सलग दुसऱ्या सुवर्णपदकाची कमाई केली. अवनीने महिलांच्या आर ८ गटातील ५० मीटर रायफल थ्री-पोझिशन एसएच १ गटात सुवर्ण कामगिरी केली.

अवनीने ४५८.३ गुणांची कमाई करीत सुवर्णपदक पटकावले, तर व्हेरॉनिका व्हादोव्हिकोव्हा (४५६.६ गुण) आणि स्वीडनची ॲना नॉर्मन (४४१.९ गुण) या अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळवण्यात यशस्वी ठरल्या.

राजस्थानच्या अवनीला अंतिम फेरीच्या सुरुवातीला अपेक्षित खेळ करता आला नाही, मात्र अखेरच्या तीन फेऱ्यांमध्ये सलग १० गुणांवर लक्ष्य साधत त्याने विजय साकारला. दुसरीकडे भारताची युवा पॅरानेमबाज रुबीना फ्रान्सिसने महिलांच्या पी २ गटातील १० मीटर एअर पिस्तूल एसएच १ प्रकारात कांस्यपदक पटकाविले.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत भारताला दोन रौप्यपदके

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आकांक्षा व्यवहारे (४० किलो) आणि विजय प्रजापती (४९ किलो) या भारताच्या वेटलिफ्टिंगपटूंनी युवा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत अनुक्रमे महिला व पुरुष गटात रौप्यपदकाची कमाई केली.

मेक्सिको येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी आकांक्षाने एकूण १२७ किलो (५९ किलो व ६८ किलो), तर विजयने १७५ किलो (७८ किलो व ९७ किलो) वजन उचलत दुसरे स्थान पटकाविले. आकांक्षा आणि विजय हे अनुक्रमे औरंगाबाद आणि पतियाळा येथील नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सराव करतात.

